# तारांगण

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २२८७

REFBK-0020717
REFBK-0020717

— काव्य रसिक मंडळ
डोंबिवली

काव्य रसिक मंडळ, डोंबिवली

२०७१७
११०७०५
काव्य
२०७१७ काव्य
११०७०५ २२०७
२२०७
REFBK-0020717
REFBK-0020717

# ता रां ग ण

[ प्रातिनिधिक कविता संग्रह ]

ह्या कविता-संग्रहाचे प्रकाशन शनिवार, दि. ५ एप्रिल १९७५ रोजी कविवर्य 'अनिल' यांच्या हस्ते झाले.

मूल्य ५ रुपये

तारांगण हे अक्षरतेचे
अनाम ह्यातिल तारे
प्रकाश ह्यांचा फक्त इशारा
प्रतिसूर्यच हे सारे


संपादक मंडळ

| | |
|---|---|
| श्री. र. म. भागवत | श्री. प्रभाकर अत्रे |
| श्री. दिनकर शिर्के | श्री. चित्तरंजन घोटीकर |
| श्री. द. भा. धामणस्कर | श्री. दीपक पुरंदरे |

प्रकाशक :

**र. म. भागवत**

अध्यक्ष,

काव्य रसिक मंडळ,

स्वानंद, टिळकपथ,

डोंबिवली (पूर्व)

प्रथमावृत्ती :

५ एप्रिल १९७५

मुखपृष्ठ :

**शरद कुलकर्णी** (मंडळ सदस्य)

डोंबिवली.

मुद्रक :

**अतुल पुराणिक,**

धूतपापेश्वर प्रेस,

पनवेल,

जि. कुलाबा.

ब्लॉक : एन्. व्ही. मुळे ॲण्ड सन्स,

मुंबई-१२

## तर आम्ही हे असे—

मराठीतील एक ज्येष्ठ व प्रतिभाशाली कवी **सोपानदेव चौधरी** यांचा आशीर्वाद घेऊन आम्ही, म्हणजेच काव्य रसिक मंडळाने १९६६ साली डोंबिवलीत कवितेचा झेंडा रोविला. काव्यावरील श्रद्धा व निष्ठा ह्यांच्या बळावर मंडळ गेली नऊ वर्षे कार्य करते आहे व सतत वाढते आहे. मंडळ ताजेतवाने राहिले आहे डोंबिवलीतील कविता व काव्य रसिकता ताजी ठेवण्यातही मंडळाला यश लाभले आहे. मंडळात प्रारंभी चार सहा कवी होते. आज कवींची संख्या पन्नासीच्या घरात आहे ही गोष्ट आम्ही साभिमान नमूद करतो.

प्रारंभापासूनच मंडळाने 'कवितेचे एक खुले व्यासपीठ' ही आपली प्रकृती कायम राखली आहे. त्यामुळे मंडळात अभंग, ओवी बरोबरच लावणी, गझलांनाही दिलखुलास दाद मिळते. गेय कविते-बरोबरच मुक्त-छंदातील लय-तालालाही रसिकांची 'वहाव्वा'ची टाळी पडते. शृंगारात व अध्यात्मात येथे सारखाच रस घेतला जातो. मराठी कविते इतकीच हिंदी, इंग्रजी कविताही इथे जोपासली जाते. सेवानिवृत्तांपासून 'बालकवीं' पर्यंत साऱ्यांना आपल्या कवितेनिशी येथे स्थान आहे.

टीका-टिप्पणी करण्यापेक्षा मनोमन कवितेचा आस्वाद घेणे हा आमचा स्वभाव आहे. कवितेला जी दाद मिळते तिच्या मुग्ध इशाऱ्या-वरून जो तो काय समजायचे ते नेमके समजतो. त्यातूनच कविता सहज स्वाभाविकतेने वाढत जाते असा आमचा अनुभव !

मंडळाच्या गेल्या नऊ वर्षांच्या वाटचालीत आपल्या कवितेने व काव्यविषयक चर्चाविनिमयाने ज्यांनी साथ दिली त्यांची नावे काव्य-प्रांतीच्या दिग्गजांची नावे होत. कविवर्य बा. भ. बोरकर, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, वसंत बापट, मंगेश पाडगावकर, शांता शेळके, वसंत वैद्य, र. कृ. जोशी (अक्षर कविता), रमेश तेंडुलकर, वा. रा. कान्त,

नारायण सुर्वे, डॉ. वि. म. कुळकर्णी ह्यांची साथ-सोबत व मार्गदर्शन आम्हास लाभले आहे. त्यांच्या सहवासात आमच्या आयुष्यातील अनेक क्षणांचे सोने झाले आहे

'केवळ कवितेसाठी व कवितेसंबंधी काहीही' अशी मंडळाची प्रतिज्ञा असल्यामुळे, 'कविता म्हणजे काय?' अशा चर्चेपासून ज्ञानेश्वरादि संत काव्यांच्या, तसेच बहिणाबाई, बालकवी, काणेकर, सुर्वे, पाडगावकर, करंदीकर, कुसुमाग्रज ह्यांच्या काव्यांच्या रसग्रहणापर्यंत अनेक प्रकारची काव्यचर्चा व व्याख्याने मंडळात झाली आहेत. ही व्याख्याने मंडळाच्या सदस्यांनीच दिली आहेत, हे साभिमान नमूद करतो. ह्याशिवाय दरवर्षी संमेलनाच्या निमित्ताने काव्यस्पर्धा, परिसंवाद, अभिरूप खटले, व्याख्याने काव्यगायन इत्यादी अनेक वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम होत असतातच. मंडळाचे सदस्य श्री यशवंत पारखी, सौ. सुलोचना घोटीकर व श्री. दिनेश वाळिंबे ह्यांचे काव्यसंग्रह मंडळाच्या कारकीर्दीत प्रसिद्ध झाले आहेत श्री. म. पां. भावे व श्री. यशवंत पारखी ह्यांची गीते 'आकाशवाणी' वरून प्रसृत झाली आहेत. त्यांच्या खेरीज सौ. घोटीकर व श्री. शिरीष देशपांडे ह्यांनी आकाशवाणीवर कविता वाचन केले आहे. कल्याण, डोंबिवली, ठाणे येथे मंडळाने काव्यवाचनाचे कार्यक्रम केले आहेत.

तांबे जन्म शताब्दी – सोहळयातही मंडळाने तांब्यांच्या कवितेवर चर्चा त्यांच्या कवितांचे सुरेल गायन, परिसंवाद, इ. कार्यक्रम केले. ह्या सोहळयानिमित्त, काव्य रसिक मंडळाच्या वतीने श्री. प्रभाकर अत्रे ह्यांनी कविवर्य तांबे ह्यांचे बहुरंगी चित्र नगर-वाचन-मंडळास भेट दिले आहे.

प्रारंभी श्री. चित्तरंजन घोटीकर, श्री. चंद्रकांत भोसेकर, श्री. मुकुंद देशपांडे, श्री. गजानन पिंगळे इत्यादी रसिकांनी मंडळाची स्थापना केली. श्री. मधुकर जोशी हे मंडळाचे पहिले अध्यक्ष. त्यांच्यानंतर श्री. प्रभाकर अत्रे हे पाच वर्षे अध्यक्ष होते. त्यानंतरची दोन वर्षे श्री. द. भा. धामणस्कर हे अध्यक्ष होते. आज श्री. रघुनाथ म. भागवत हे अध्यक्ष आहेत. मंडळाची लिखित घटना नसली तरी व्यावहारिक

संकेताप्रमाणे आमचे काम बिनबोभाट चालू असते. दर महिन्याच्या पहिल्या रविवारी एखाद्या सदस्याच्या घरी मैफल सजते. चहा-चिवड्याच्या संगतीत काव्याचा आस्वाद घेतला जातो. केंव्हातरी नाइलाजाने मैफल संपवावीच लागते. नव्या उभारीने पुढील कार्यक्रमाचे चित्र रंगवीत सर्वजण रेंगाळत रेंगाळत घरी परततात.

अध्यक्ष, कार्यवाह वगैरे मंडळींशिवाय मंडळ कसे सजणार? पण आमचे मंडळ सर्वांचेच आहे. सर्वचजण कसल्याही कामास तत्पर असतात. आमचे खंबीर कोषाध्यक्षही कशाला नाही म्हणत नाहीत. मंडळाचे सर्वच निर्णय सर्व सदस्यांच्या संमतीने ठरतात. फार काय, काव्यसंग्रह कसा काढावा, त्याला नाव कोणते द्यावे, हेही ' जनमत कौला'स अनुसरूनच ठरले. अनेक दिवस काव्यसंग्रह काढावा ही कल्पना सद-स्यांच्या मनात घोळत होती. परंतु तांबे जन्मशताब्दि वर्षात तिला गती मिळाली. ह्या सोहळयाच्या काळात काव्य संग्रहाच्या कल्पनेने मूर्त रूप धारण केले. आज हा प्रातिनिधिक काव्यसंग्रह रसिकांपुढे डौलाने येत आहे.

कलासाधनेची वाट खडतर असते. अनेकांना अशा वाटेवर एकट्याने प्रवास करावा लागतो. मंडळाने मात्र सर्वांना एकमेकांच्यां संगतीचा लाभ देऊन ही वाट सुगम करण्याचा प्रयत्न चालविला आहे. अनेक ज्येष्ठ मान्यवर कवींनी त्याबद्दल केलेले कौतुक आम्हास दीर्घकाळ प्रेरक ठरणार आहे. काव्यसंग्रहाच्या द्वारे आमचे विचार रसिकांपुढे मांडण्याच्या ह्या प्रयत्नाला रसिकांची दाद मिळेलच ह्या विश्वासाने हा संग्रह तुमच्या हाती सोपविणारे.

डोंबिवली, **–असे हे आम्ही**
( तुकाराम बीज )
२९ मार्च १९७५

सौ. मृदुला श्रीनिवास गडनीस १
द. भा. धामणस्कर ३
दिवाकर अनंत घैसास ७
यशवन्त पारखी १२
म. पां. भावे १५
ना. ज. जाईल [ मिलिंद ] १७
सौ. सुलोचना घोटीकर १९
गजानन पिंगळे २३
सौ. अंजली सावले २७
दीपक पुरंदरे ३०
र. म. भागवत ३४
विजय आपटे ३८
गो. ना. कारखानीस ४१
रघुनाथ तावरे ४४
प्रभाकर अत्रे ४७
के. एन्. मुदलियार ५१
तु. वि. सूर्यवंशी ५४
कु. नीलिमा मोडक ५८
मनोहर वाटवे ६०
बाळ राजयोगी ६३
प्रकाश सहस्रबुद्धे ( निराश ) ६५
कमलाकर राऊत ६७
अशोक महाशब्दे ६८
रा. शं. अत्रे [ राश्मात्रे ] ७०
शशिकांत पाळंदे ७३
वसंत गोखले ७७
शिरीष देशपांडे ७९
विकास कारखानीस ८१
शरद कुळकर्णी ८४
मुकुंद नारायण गोखले [ एम्. नारायण ] ८८
दिनकर शिर्के ९०

सौ. मृदुला श्रीनिवास गडनीस

## व्यथा

नभ कोसळले मनी
झाली त्याची ओली माती
आली रुजून त्यातून
इवलीशी तृणपाती

शिंपिले मी मेघ तेथे
दिला आधार निळासा
चंद्रचांदण्यांचा चुरा
तळी घातला थोडासा

तृणपाती फोफावली
तुरे वर डोकावले
जिथे मूळ रुजले ते
मन मात्र दुरावले

## तुझ्यासाठी

तुझ्यासाठी मांडिला हा
शब्द ब्रह्माचा प्रपंच
तुझ्या एका स्मितानेच
उभारला स्वप्नमंच

शब्द थोडे तुझ्यासाठी
थोडे माझ्या स्वार्थासाठी
तरी आकाश तुझेच
झुरते मी चंद्रासाठी

## मागणे

तुझे आकाशाचे दान
माझी ओंजळ अभागी
तुझ्या प्रकाशाच्या राशी
माझी बिंदूची मागणी

सांगू काय तुला आता
न देता तू सारे दिले
फुले वेचता कृपेची
क्षुद्रपण उद्धरले

श्री. द. मा. धामणस्कर

## दिवे

दिवे असावे कोमल हळवे
अंधाराहुन उजळ जरासे
दिवेलागणी झाल्यावरती
अंतर्यामी खिन्न कसेसे

दिवे असावे अबोल प्रेमळ
तिच्यापरी जे वाट पाहती
उभे राहुनी व्याकुळ अंतर
येणाऱ्याची चाहुल घेती

दिवे असावे आत्मज्ञानी
त्यांना न मुळी गर्व असावा
अंधाराचिच सत्ता नव्हती
इतुका त्यांनी प्रकाश द्यावा

दिवे असावे जगन्मित्रसे
कुणाशीच त्या वैर नसावे
तिमिराशीही जमेल तेव्हा
हितगुज त्यांनी रोज करावे

दिवे असावे रसिकहि केव्हा
तारांकित नभ त्यांचे व्हावे
चांदण्यात कधि न कळत त्यांनी
हळुच चांदणे होउन जावे

# ती आल्यावर

ती आल्यावर घर आनंदित
खिडक्या दारे हसली
भुई रोजची पायतळीची
कवितेने मोहरली

लेक लाडकी घरि आल्यापरि
भिंती वत्सल झाल्या
छताउरीच्या पितृभावना
अवचित दाटुन आल्या

कालचक्रसे घड्याळ थांबे
क्षणभर भिंतीवरले
आनंदाने पंखे भिरभिर
स्वतःभोवती फिरले

वस्तु हरखल्या सर्व घरातिल
चाहुल येता उठल्या
काळवंडल्या ताटवाटिच्या
मुद्रा उजळुन आल्या

देवघरातिल सर्व देवगण
'स्वागत स्वागत' वदले
निरांजनातिल ज्योतीचे जग
स्नेहे दाटुन आले

आता घरभर वसंत-उत्सव
फुलतिल गुलाब दारी
सुवास त्यांचा ती आल्याची
खबर सांगतिल सारी

## ह्या फुलांचे काय करावे ?

वाढदिवशी सुप्रतिष्ठिताच्या
भेटीस आलेली ही अनंत अगणित फुले...
" ह्या फुलांचे काय करावे ? "
हे बिरबलही सांगू शकणार नाही
कारण, सर्व कारण-परंपरेच्या पलीकडचे
त्यांचे " असणे "
त्यांना आमचे हेतू चिकटविता येणार नाहीत
फुलांकडे फक्त पहा डोळे भरून
पहा कशी असतात अस्तित्वाच्या मस्तीत
पहा कशी असतात सर्वस्वी त्यांचीच
सदैव झाडावर वा मातीत
फुलण्यापूर्वी, फुलताना वा निर्माल्य झाल्यावरही
परमेश्वराला शरण गेलेल्या ह्या कोमल पाकळ्यांनी
मृत्यूला न-गण्य केले आहे...
फुलांचे काहीही करा; ती आमच्यासारखी रिक्त नाहीत
तुमच्या करण्याचे ओरखडे—
त्यांच्या आत्म्यावर उमटणार नाहीत
त्यांना आपली प्रतिष्ठा जन्मतःच लाभली आहे
म्हणून महाराज, फुलांचे काय करावे हा प्रश्न—
फक्त तुमचा आहे
तसा सर्व उपयुक्ततावाद्यांचाही
पण त्याचा फुलांशी संबंध नाही
कारण त्यांचे " असणे "
तुमच्या प्रश्नाहून अनादी आहे

तुम्हाला शब्द माहीत नव्हते
तेव्हाही ती होती आणि
तुमचे बोलणे संपले तरी
ती असणार आहेत—
जशी होती तशी
अस्तित्वास शरण
अस्तित्वमय, अशरण्य...

श्री. दिवाकर अनंत वैसास

## शब्द हे आश्वासनांचे

शब्द हे आश्वासनांचे बोचताती अंतरी
भूक माझी शाश्वताची, द्या मला ती भाकरी
वर्णने स्वर्गातली का ऐकवीता पोकळ ?
द्या मला हो अंथराया एक उरली वाकळ
जीव सुकला या निदाघी पाय माझे पोळले
संकटांच्या कंटकांनी रक्त माझे सांडले !
मागतो मी जो निवारा श्रांत गात्रां वादळी
तो न देता घोषवाक्ये उतरवीता का गळी ?
शुष्क तत्त्वज्ञान खोटे, द्या मला पाणी खरे
कोरडे उपदेश का हे ? दुःख माझे नावरे !
मी युगांची मागणी ही घेउनी दारी उभा
पृथ्विचा आक्रोश माझा, ऐकवीतो मी नभा
कोंडला हा जीव माझा, द्या मला ताजी हवा
धूप, अंगारे नको हो, घास अन्नाचा हवा
जीवनाचा मार्ग माझा, संगती माझ्या चला
गाव शब्दांचा पुराणा, फार मागे राहिला !

## कट्-पीस

कोचाची स्प्रिंग टोचते
म्हणून तक्रार केलीस;
नवा टीव्ही बिघडला
म्हणून चिडलास;
मॅचिंग कट्पीस मिळत नाही
म्हणून वैतागलेल्या बायकोला
साडीच बदलायला सांगितलीस

पहा जरा डोळे उघडून–
तुला काहीच कसं टोचत नाही ?

घरी भांडी घासायला येते
ती इवली पोर
थंडीत कुडकुडते
भेगा पडलेले तळहात पाहिलेस तिचे ?

पावसाच्या माऱ्यात, रेल्वे लायनीत
तुंबलेल्या पाण्यात–
कष्टांची तुडुंब आंघोळ करीत,
तुमची गाडी पुढं जाण्यासाठी
आपल्या जिण्याचा पांगुळगाडा
ओढणाऱ्या मजुरांचे हात !

तुझ्या कपड्याला कडक इस्त्री
करता करता खोकणाऱ्या
कोपऱ्यावरल्या त्या
रामशरणचे घट्टे पडलेले हात !

जेव्हा पहाटेच्या वाऱ्यात
सायकल मारीत...
थंडावल्या दुधाच्या बरण्या
येतात माप घालायला,
उंबरठ्याशी तुझ्या...
तलफ तुझी पहाटेची
पुरी करायला...
तेव्हा त्या माप घालणाऱ्या
हातांचा गारठा...

सावल्या वेळात
देवळाकडे जाताना
दिसतात का तुला
महारोग्यांची
लाल, बोथट बोटं
ज्यांना नेल पेंट
नकोच असतो कधी
भिकाऱ्यांच्या
नको तिथं फाटलेल्या वस्त्रांतून
डोकावते तुझीच लाज...
मागणाऱ्या हातांच्या
पाची बोटांतून पेटते
भुकेची आग...
लागत नाही तुला
तिची आच ?
टी. व्ही. पहाताना
डोळे चुरचुरतात तुझे
दुनियेतलं मॅचिंग
किती बिघडलंय...
काही कसं टोचत नाही
सलत नाही ?
उरला आहेस
तू पण
एक कट् पीस
जो कशाशीच जुळत नाही !

## फुगे

सामान्य माणसांपेक्षा
जरा वर...
गर्दीतील बालिश लोकांना
भुरळ पाडीत
तरंगतात रंगीबेरंगी फुगे
दीडदमडीचा रबर ताणून,
उसनी हवा भरून फुगलेले;
क्षणभंगुर...
त्यातले काही धाडसी
"आहे तरी केवढे ब्रह्मांड
पाहू या वर जाऊन
हरवलो तर हरवलो,"
अशा ईर्ष्येने सुटतात;
गगनाला भिडतात...
काही मात्र सुताने
स्वर्ग गाठणारे
वाटेल तेथे स्थिरावून
नको तेव्हा फुटतात...
पुष्कळसे तसेच रेंगाळतात,
सामुदायिकपणे 'असतात.'
"कोणी पुरस्कार करीत नाही
उसन्या फुंकरीनं फुगवीत नाही,"
म्हणून ओशाळलेले; आशाळभूत;
पाठीला पोट चिकटलेले;
आपली पोटेन्शिअल्स जपत

फक्त रबराची दुर्गंधी देतात
चुकून त्यातला
चौकटीच्या खोक्याबाहेर पडलेला
फुगून तरंगलाच एखादा
तरी कोणीतरी
टाचणीने टोचून शब्दांच्या
निर्वात करतात त्याला...
फुग्यांच्या जगातही
अपघात आहेत;
नशीब आहे;
ॲबॉर्शन आहे
आता तसा कायदाच आहे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

श्री. यशवन्त पारखी

## किती वादळावे ?

अशा आर्त आकाश भेदून हाका
कळो ना कळो मी तुला बाहतो

कुणा सत्य वाटो न वाटो परंतू
अमर्याद रंगामधे नाहतो

दवातून सदांचलेल्या निळाई-
तुनी येऊनी मी तुला पाहतो

अनामीक एका दिशेच्या कडेने
तुझ्या पाउलांच्या खुणा वेचतो

स्वरांच्यापुढे आठवा सूर ज्याचा
असा शब्द ओठात घोटाळतो

दुभंगून दंडातल्या लोहबेड्या
जुने पर्वतांचे कडे शोधतो

उसासून येतो दिशातून वारा
पिसारा पुन्हा तोडुनी फेकतो

असा उष्णतेवीण अंगार ज्याच्या
धगीतून ओल्या कळ्या मांडतो

तुझे हात हातात घेऊन गाते
पिशी रात्र काळ्या नभी हिंडते

खुळ्या तारकांना कशी आकळावी
मुक्या मेघखंडातली श्वासिते

असे रोज आता किती वादळावे ?
किती उन्मळावे मुळापासुनी ?

किती उंच जावे ? किती कोसळावे ?
तुवा घेतल्या पापण्या कापुनी

## बारा मासांचा सम्राट

आला सावळा श्रावण बारा मासांचा सम्राट
मेघ तुतारी फुंकतो वारा धावतो सुसाट
निळे शेमले बांधून उभे डोंगर थाटात
ओली हिर्वळ नेसून वाट लाजते घाटात
नदी कुवार बावरी तिची नजर सैराट
मेघ तुतारी फुंकतो वारा धावतो सुसाट
पाणी पिऊन शेताला आली भोवळ क्षणात
आणि झिंगून पडले माड बांबूच्या बनात
एका बारक्या ओढ्याचे पोट सुटले विराट
मेघ तुतारी फुंकतो वारा धावतो सुसाट
गाई वासरे खिल्लार आले गोठ्यात भिजून
मुकी पाखरे भिऊन गेली पंखात निजून
खुळा वेंधळा पाचोळा घाली गोंधळ पिसाट
मेघ तुतारी फुंकतो वारा धावतो सुसाट
दिशा सवाष्ण न्हालेल्या केस मोकळे सोडून
वीज भावीण नाचते हाती कापूर घेऊन
भोळ्या पोटूशा मातीचे झाले उजळ ललाट
मेघ तुतारी फुंकतो वारा धावतो सुसाट
गर्जे आकाशी चौघडा झांजा लाटांच्या वाजती
टाळ्या पानापानातून चाले श्रावण-आरती
आल्या लेझीम नाचत जलधारा पाठोपाठ
मेघ तुतारी फुंकतो वारा धावतो सुसाट

## हातांना जर डोळे असते

दिले घेतले चाचपणाऱ्या
हातांना जर डोळे असते
तर वाटेला पायखुणांचे
ओझे इतके झाले नसते

श्वासांना जर हुंकाराची
अरबी भाषा कळली असती
तर खडकावर लाट एकटी
दिवसाढवळ्या रडली नसती

देता घेता ओठांना जर
कोण कुणाचे कळले असते
तर लोखंडी खांब दिव्यांचे
पावसात पाझरले नसते

छातीवरच्या दंशांना जर
वळवळणारी जिव्हा असती
तर ?–
बुबुळाखाली जळजळणारी
उन्हे एवढी कळली नसती

श्री. म. पां. भावे

## तीन कविता

### खुशाली

नव्या घराचा अनुभव घेउन
आलिस मजला भेटायाला
वदलिस क्षणिक हर्षभराने
" उणे न आई काही मजला ".
अश्रू पडले मम पायावर
नमस्कारिता वाकुनि खाली
गहिवरला मम कंठ तेधवा
आणि उमजली तुझी खुशाली.

### अपेक्षा भंग

तप्त झाल्या जमिनीला मेघानं डोळा घातला
पडपड पडणारा पाऊस समुद्रात कोसळला
मनातील आकांक्षांना स्वप्नांनी झालर घातली
चितारलेल्या मंदिरावर लख्कन् वीज पडली

### सुख– दुःख

दुःख बिनधास्तपणे धावतं
सरळ, तुळतुळीत डांबरी रस्त्यासारखं
सुख नेहमीच गोते खातं
भूकंपाने तडकलेल्या भेगाळ जमिनी सारखं

## संगत

तूही माणूस, मीही माणूस
पण मधे खोल दरी
विचारांची, वृत्तीची, स्वभावाची
धडपड धडपड धडपड
हीच माझी अखंड वेदना
तू मात्र निराळी !
धडपडीपेक्षा तुला हवी मधाळलेली बडबड
आयत्या बिळावर नागोबा व्हावं
हाच तुझा छंद
मी तुडवितो काटे, इतरांना गुलाब देण्यासाठी
मला प्रिय मीठ भाकरी, हौस चांगलं वाचण्याची
तुझी हौस रंगेलपणाची. भूक तुझी मिष्टान्नाची
कशाला धरतेस माझी संगत ?
अमावास्येला प्रकाशाचा किरण
सुखावू शकेल का ?
दिवसाला रात्रीचा अंधार
सहन तरी होईल का ?

## मी स्वप्न रंगवीतो

परिणाम काय अंती, ठाऊक हे असोनी
मी स्वप्न रंगवीतो, आतूर लोचनांनी
जो जन्मताच अंध, त्याला कुठून दृष्टी
नियमाविरुद्ध जाणे, हे ओळखे न सृष्टी
पाऊलवाट बुझते, येता धुके जमोनी
मी स्वप्न रंगवीतो, आतूर लोचनांनी
गीतास ताल नसता, बदसूर होय गाणे
फिरताच दैव–फासे, आयुष्य हो दिवाणे
पाण्यावरील रेषा, जाणारची पुसोनी
मी स्वप्न रंगवीतो, आतूर लोचनांनी

श्री. ना. ज. जाईल ( मिलिंद )

## तारण

भरली घटिका लग्नमंडपी
समोर धरला अंतरपाट
विसरायाला हवाच मजला
गोकुळ आणिक यमुनाघाट

घाटावरची राधा गौळण
भिनली आहे नसानसातुन
आज सांडते जल यमुनेचे
डोळयांमधुनी आसू होउन

या आसूंची माला लेवुन
उभी मंडपी राधा गौळण
आणि घटातिल दहि दुध लोणी
कृष्णाजवळी आहे तारण

## स्वप्न

क्षितिजावरतीच आकाश थांबले होते तेव्हा
मी पुढे गेलो होतो
...अंधारातूनच
आणि ओल्या मातीच्या वासाने
धुंद होऊन
चराचरात विलीन होणारी
साद घातली होती
तुला...
तू आणि मी
एकाच झाडाची पाने...पण

हरवून बसलो होतो स्वतःला
...वेड्यासारखा.
झाडावरची लाल फुले पाहून
कोलंबस भिनला होता माझ्यात तेव्हा
अनुभूतीच्या साक्षात्काराचा
भ्रमच तेव्हा झाला होता
...मीच मला ओळखले नव्हते.

## तीन अभंग

चंदनाच्यासाठी
मन झाले वेडे
जळता कळाले
लाकुड बापुडे

कधी कधी होतो
देहाचाच भार
वाटे निराकार
जीणे हवे

कळले उशिरा
चुकले मागणे
मिळाले जे हाती
जन्मी या भोगणे

## माझ्या घराच्या भिंतींनों !

आली दिवाळी दिवाळी, स्वागताला सिद्ध होते
माझ्या घराच्या भिंतींनो ! तुम्हाला मी सारवीते

घरी आले तेव्हा मी गे, हळदीच्या पावलांनी
सावरीत शालू नवा, लाज दाटली लोचनी
नवे नाते, नवे घर, संकोचले बावरले,
देत आधार हळूच तुम्ही मला सावरीले
किती वर्षे लोटली त्या, परी आज सय येते
माझ्या घराच्या भिंतींनो ! तुम्हाला मी सारवीते

झाले घराचे गोकूळ, कान्हा माझ्या घरी आला
ठसा पावलांचा त्याच्या इथे तिथे उमटला
" आई तुझे चित्र काढू ! " बाळ माझा तेव्हा बोले
तुम्ही झालात फलक, बिंब तेथे उमटले
अजूनही प्रतिमा ती प्रेमभराने पाहते
माझ्या घराच्या भिंतींनों ! तुम्हाला मी सारवीते

कधी विरह प्रियाचा, मन माझे व्याकुळले
स्कंधी तुमच्या विसावा घेत डोळे मी मिटले
विरहाच्या यातनांनी मन जळे आत आत
मिळे तुमची सोबत जीवघेण्या एकांतात
तुम्ही थोपटले तेव्हा, आजही ते जाणवते
माझ्या घराच्या भिंतींनो ! तुम्हाला मी सारवीते

कधी आप्त स्वकीयांनी घोर अपमान केला
तुम्ही डोळयांनी पाहिला, नाही कोणा सांगितला
विष माझ्या प्राक्तनाचे तुम्ही पिऊन टाकले
रंग तुमचा उडाला, परी मला धीर मिळे

कसे कुणाला कळावे अतूट हे असे नाते
माझ्या घराच्या भिंतींनो ! तुम्हाला मी सारवीते

माझ्या घराच्या भिंतींनो ! रहा अशाच जोमात
सहभागी अशाच व्हा माझ्या सुखात, दुःखात
माझ्या आनंदे तुम्हीच झळाळला तेजासवे
माझे डोळे पाणावता, तुम्ही ढाळली आसवे
माझा आरसा तुम्हीच, बिंब त्यातच पाहते
माझ्या घराच्या भिंतींनो ! तुम्हाला मी सारवीते

## कुणी एक

रथ प्रभाकराचा गुलाल उधळित जातो
कुणि एक मेघ त्या साठवुनी उरि घेतो
चमचमती तारा, सम्मेलन जणु भरते
सान्निध्य शशीचे रोहिणिला परि मिळते
विस्तीर्ण जलाशय कमलांकित होईल
ईशाच्या चरणी कुणी एक जाईल
स्वातीच्या धारा सागरात कोसळती
शिंपला तिष्ठतो कोणा एकासाठी
कृष्णाच्या भवती रास अता रंगेल
प्रत्येक गोपिका राधा कशि होईल ?

## चीज संसार-गीताची !

माहेरच्या अस्ताईत
गुंफे सासर-अंतरा
चीज संसार-गीताची
गात आले तुझ्या घरा

तुझ्या-माझ्या षड्जात
फुले बाग भावनेची
मीलनाच्या रिषभात
जाण हरवे विश्वाची

श्वास गंधार बनले
दरवळला सुवास
मध्यमाच्या सौरभाने
होई प्रिय सहवास

पंचम तो वात्सल्याचा
होई स्थीर निरंतर
जाणीवेच्या धैवताला
नको नेणीव-किनार

मांगल्याच्या निषादाची
वीणा हळूच छेडावी
संसाराच्या सप्तकाची
घाळवावी स्वप्न-ओवी

शुद्ध-कोमल स्वरांचा
धुंद आरोह-सोपान

तसा अवरोह घेता
गावे जीवनाचे गान

आसावरी मल्हाराचे
गाणे सुरेल ते गावे
उणीवांच्या बेसुरांना
दूर हळूच सारावे

मधु सारंग गाईला
भर दुपारच्या वेळी
गौरी राग आळवीता
सुखावेन सायंकाळी

श्री. गजानन पिंगळे

# अद्वैताचे माहेर

माझी फिरायाची वाट शांतशांतशी असावी
माझ्या ओसाड जीवनी तिने संजीवनी द्यावी
वर आकाशाची छाया, खाली भूमीचा आधार
नको तेथे जीवघेणी वाहनांची कुरबूर
नको पांथस्थांची गर्दी, नको त्यांचे हेवेदावे
नको पोरसवदा ते प्रेमिकांचे व्रात्य थवे
एकांताशी एकरूप माझी एकतारी व्हावी
माझी फिरायाची वाट शांतशांतशी असावी
नको थोडासुद्धा तेथे राजकारणाचा वास
नको अर्थशून्य गप्पा, किस्से बाताड्यांचे खास
नको स्वार्थ, नको अर्थ, नको फुकाचा परार्थ
नको शब्दांचा जंजाळ, नको खोटा अन्वयार्थ
सौंदर्याचा वेध घ्याया मला दिव्य दृष्टि यावी
माझी फिरायाची वाट शांतशांतशी असावी
वाट माझी ती असावी लांब लांब मैल मैल
तिचे माझे स्नेह धागे कधी होवोत ना सैल
तिने मार्ग दाखवावा, आणि मी तो आक्रमावा
कोणी वंदो, कोणी निंदो, मला नाही त्यांचा हेवा
वैराग्याच्या वैभवाची गाथा तिनेच सांगावी
माझी फिरायाची वाट शांतशांतशी असावी
माझ्या वाटेच्या टोकाला एक असावी टेकडी
तेथे छोटीशी असावी भोळ्या सांबाची झोपडी
सत्य, शिव, सुंदराचे बिल्वपत्र अन् खुडावे
डोळे मिटून भक्तीने गौरीशंकरा वहावे
अद्वैताच्या माहेराची रोज गाठ–भेट व्हावी
माझी फिरायाची वाट शांतशांतशी असावी

## हरपला जवाहर

का हिमालयाचा आज उतरला नूर ?
का सिंधूसागर रडतो फोडुन ऊर ?
का चंद्र नभीचा दिसतो केविलवाणा ?
का मेघ चालती घालुन खाली माना ?
का राष्ट्रध्वजाची कंबर ती खचलेली ?
का गुलाबकलिका हसते आज न गाली !
का तारुण्यावर वृद्धत्त्वाची छाया ?
का जीवन भासे केवळ सारी माया ?
का मानवता ती दिसे पोरकी आज ?
का पंचशिलेचा फुटतो ना आवाज ?
का मुसमुसुनी ते विश्व हुंदके देई ?
का अश्रू म्हणती, ' त्राता आम्हा नाही ' ?
' हरपला जवाहर ! दलितांचा सम्राट ! '
हे एकच उत्तर घुमले दाहि दिशांत
नतमस्तक होता राजघाट तो यतिवर-
उमटला शिळेतुन रामनाम झंकार !

## माझा नवरा मला प्यार !

जाडा असो, लुकडा असो,
असो अथवा काळा शार,
माझा नवरा मला प्यार
माझा नवरा मला प्यार !
तारुण्याची फुलता बाग
बाबांस आली एकदम् जाग
हिंडू लागले बोळन् बोळ
डोळे त्यांचे गेले खोल

घरात उठल्या बसल्या खटके
देऊन जाती मला चटके
बाबा आमचे गरीब फार
आईस करती नमस्कार
रुजला तेव्हा मनी विचार
माझा नवरा मला प्यार!

'काळे' आले, 'गोरे' आले
मुळे आले, भोपळे आले
आले कधी माणकेश्वर
कधी आले गचकेश्वर
संत आले, पंत आले
गोळे आले, भोळे आले
प्रधान, मंत्री सारे झाले
सर्वांकडून नकार आले
तरिही वेडा मनी विचार
माझा नवरा मला प्यार!

एके दिवशी काणे आले
नावासारखेच त्यांचे डोळे
तिरकस दृष्टी, रूप काळे
बाबांचे तर पायच गेले
झाली आई कासावीस
काय विचारता घासाघीस!
हो ना करता एकमत झाले
नकार त्यांना द्यायचा ठरले
तोच आला तिकडून होकार
माझा नवरा मला प्यार!

पदरी पडले, पवित्र झाले
आई, बाबा खूष झाले

सौंदर्याचा खून पडला
बंडू धडे देऊ लागला
'डोळ्यात काय अन् रंगात काय ?
नावात काय अन् रूपात काय ?
माणुसकी काही चीज आहे
अन् काणे तसा 'क्लास्' आहे !'
एकदम पटला मला विचार
माझा नवरा मला प्यार !

पाहुणे आले, घर भरले
काणे-डोळे एक झाले
बोलल्या सख्या, 'आहे ब्वॉ मौज !
आत्ता होईल तैय्यार फौज !'
वदले बाबा, 'जोडा छान
बाबी आमची नशिबवान !'
खुदूकन् सारा मांडव हसला
मीच त्याचा भाव जाणला
हाय ! आता कसला विचार ?
माझा नवरा मला प्यार !
जाडा असो, लुकडा असो,
असो अथवा काळा शार
माझा नवरा मला प्यार
माझा नवरा मला प्यार !

सौ. अंजली सावले

## बीजात पुन्हा मी

किती फेसाळत हे पाणी
बुडबुडा विरतसे कोणी
ती खंत जळाला नाही
ते फेसाळतची राही

किति फुले बहरली रानी
ते एक गळतसे पानी
ती खंत सृष्टिला नाही
ती अक्षय फुलतचि राही

किति तारे झळकत गगनी
तो एक निखळतो कोणी
ती खंत नभाला नाही
ते लखलख उजळत राही

बहु राग हे जीवन-गानी
लय एक संपली कोणी
ती खंत जगाला नाही
ते आनंदातच गाई

भय मुळी नसे ते मरणी
मी फूल फुलुन अंगणी
मी गळत बीज ते पाही
बीजात पुन्हा मी येई

## झेप

हौस मोठी असायची
छान छान दिसायची
जरतारी वसनांची
रत्नमोती माणिकांची

हौस मोठी असायची
सागरात डुंबण्याची
लाटेवरी खेळण्याची
खळाळून हसण्याची

हौस मोठी असायची
चांदण्यात धुंदण्याची
प्रीतभरे पाहण्याची
अश्रू मोती वेचण्याची

हौस मोठी असायची
जाईजुई माळण्याची
गंधासवे बोलण्याची
हळुवार स्पर्शण्याची

हौस मोठी असायची
प्रीतरंगी रंगण्याची
भान सारे भुलण्याची
मूकपणे नाहण्याची

हौस सारी झरायची
काळासवे हरायची
कवचा या भेदण्याची
धडपड उडण्याची

अंड्यातून जीव माझा
आभाळात दूर लक्षी
पंख पसरूनी झेप
मन आज पूर्ण पक्षी

‘ वेल ’

मधुमानसाची वेल, तिला आधार आकाश
निळया मांडवाचा डौल, वर प्रकाश प्रकाश
वेल सर सर गेली, तिला प्रकाशाची ओढ
खांबाविण ही चढली, तिला कशाची ना तोड
मति रसरसलेली, शुद्ध रसाचा गे जोम
वेल डवरून आली, पानापानात ग व्योम
पानापानात कलिका, भाव-फुलांना बहर
लक्ष फुलल्या तारका, कसा थांबला प्रहर ?
फुले साजिरी गोजिरी, ज्ञानमधूने भरली
गंध प्रीतीचा कोमल, दिस रात्र ना उरली
मधुमानसाची वेल खुल्या उन्हात फुलली
आसू आनंदाने दव, निरामयात नाहली

श्री. दीपक पुरंदरे

## बिंदूंची पाउले

बिंदूंच्या अस्तित्वाच्या पावलांनी
विंध्यांचे गाठोडे घेऊन
मी अनन्त प्रकाशवर्षं चालतो आहे.

वाटेवरचा प्रत्येक कपटा वेचताना
झालेला हर्षोन्माद
पुढील कपटा गाठोड्यात खोचताना
मी पायदळी तुडविला;
आणि त्याच्या ठशातील रेषारेषांवर
उठलेल्या पेल्यातील वादळात
उडी घेणारे जंतू
कसलीच धग न घेता
मरून पडले !

इक्वेशन्सच्या लांब शिड्यांनी तोडलेले अंतर
अपवादाच्या सापांनी हज्जारदा गिळले.

पण सरावलेले हात
फासे खुळखुळवतच राहिले.

कारण
गिळलेल्या अंतराने मी हजारो वर्षे
पुढेच गेलो होतो.

जोपर्यंत टाईम स्पेसच्या अक्षांची मगरमिठी
माझ्या शाश्वतांचे श्वास भरलेल्या छातीभोवती आहे

तोपर्यंत
माझ्या गाठोड्यातील सारे काही सांडले
तरी–
मला भय नाही
मला भय आहे माझ्या पावलांचे
बिंदूंच्या पावलांचे.
ह्या प्रचंड प्रवासात आणखी कोणीतरी
खूप पुढे गेले आहे
जेव्हा मी आकाशगंगेतील ताऱ्यावर दुर्बिण लावतो
तेव्हा तो ती पार करून
धूमकेतूपाशी गेलेला असतो.
माझी जळती पाउले तेथे पोहोचण्याआधीच
तो प्रचंड उल्कापाताखाली नहात असतो
अखेरच्या विश्वसूत्रावर
होणारा पहिला अभिषेक
माझ्या रक्ताचा हवा.
म्हणून उसळणारे माझे रक्त
त्याच्या चाहुलीने
गोठून जाते.
कधीतरी होणाऱ्या रात्री जेव्हा
गाठोडे उशाशी घेऊन मी आडवा होतो
तेव्हा उत्तर रात्रीच्या झुळुकेतला सुगंध
मला सांगत राहतो,
" प्रवासात पुढे गेलेल्या त्या विदेहीने
अखेरच्या विश्वसूत्रावर फुलांचा अभिषेक करून
तुझ्या पावलांचा जन्म
केव्हाच साजरा केला आहे "

## काचडोळा

माझे काचडोळे करतात
पांढऱ्या शुभ्र प्रकाशाचे ता–ना–पि–हि
आणि निळ्या ओली कवितेच्या
सुरात वाचतात धडाधड
बाराखडीच्या
माझ्या काचेरी डोळ्यांना आता
नेमकी ओळखू येते
खरी आणि खोटी नोट
नफातोट्याच्या त्रैराशिकावर
नजर फिरवीत झटपट
उडत्या पक्ष्याचे मोजून घेतात
एकूण एक सारे पर
रस्त्यावरचे नाही सुटत
एकही कबूतर
माझ्या काचेरी डोळ्यांना चालतो
फक्त फ्राइड माल्थसचा चष्मा
ज्याचे दोन्ही पाय नेमके पडतात
हात ठेवलेल्या कानावर
शोकेसमधले शब्द चाचपून
क्वचित् करतात सांत्वन
आणि दुखाचे कढ काढीत रडतात
फक्त डिस्टील्ड वॉटर.

## शिंपा

हरवत नाहिस कधिच स्वतःला
वाटे तुजपण मी हरवावे
दूर जायचा करित बहाणा
वाटे हरवुन जवळी घ्यावे

शब्दाशब्दांचे डोलारे
पुन्हा पुन्हा मी उभे करावे
एक मोजका शब्द नेमका
टाकुन तू ते रिते करावे

ते शब्दांचे मुके रितेपण
अर्थाने हळु गोंजारावे
आणि तळाशी खोल जळाच्या
मखमालीचे तुरे फुलावे

मी हस्ताचा धुवांधार अन्
तू स्वातीची अलगदशी सर
एक मोजका थेंब नेमका
का मोत्यांनी पण असे हसावे ?

श्री. र. म. भागवत

## ' गणेश उत्सवातील एक कार्यक्रम '

देवळातील मांडवाच्या खांबांना
सवय झाली होती अलिकडे
खूप गर्दीची, गडबडीची, गोंधळाची,
' हॅलो-हॅलो माइक टेस्टिंग 'ची
आणि कर्कश शिट्ट्यांची.
त्या दिवशी वाटत होतं त्यांना
अगदीच सुनं सुनं !
' अजून कसं कोणी नाही ?
नऊ वाजले की !
एव्हाना कसं सगळं तुडुंब
भरून जायला हवं '.
आले आले...
एक, दोन, तीन...
हातात बाडं घेऊन
आले लोक मोजून बावीस.
( एखाद्या वाद्यवृंदापेक्षाही
दोन तीन जास्तच ! )
आणि अहो आश्चर्यम् !
सगळी कामं टाकून
चार-पाच बायकासुद्धा !
हे नक्कीच आजचे कलाकार असणार !
साडे नऊच्या कार्यक्रमाला
नऊ वाजताच दुसरे कोण येणार ?
पण श्रोते ?
आणि नुसतंच इकडे-तिकडे
बघायला येणारे प्रेक्षक ?

निदान चपला चोरायला तरी
येतील कुणी तरी ?
'शांत बसा, शांत बसा',
खांब ओरडले नेहमीप्रमाणे...
आणि लाजून त्यांनी तोंडं बंद केली.
सुरुवात झाली हं !
कोण हा बोलला प्रथम ?
म्हणत होता सारखा,
'आठवतंय मला, आठवतंय मला'...
म्हणजे अलिकडे स्मृतिभ्रंश
झाला होता की काय त्याला ?
काढली बाडं, काढल्या कविता.
कोणाच्या जुन्या, कोणाच्या नव्या.
कोणीतरी केली
रात्री दहा वाजताच पहाट !
('अरे, काही काळवेळ ?'
'हे लोक कालातीत असतात म्हणे !'
'असतील असतील !')
कोणी आणला भाद्रपदात श्रावण
कोणी आणला महागाईचा रावण.
कोणी आणली इसापनीति
कोणी भिंती सारवायला माती.
कोणाला टोचतात सासरचे काटे
तर कोणाला अद्वैताचा कढ दाटे
कोणाच्या बायका
कडू, गोड, तिखट
कोणाचे नवरे
मठ्ठ, चकणे, सुकट
कोणी म्हणे–'तू हसलीसच का ?

अग वेडे, तू असलीसच का ?'
कोणी म्हणे–' यालाच जीवन
म्हणायचं !'
कोणी म्हणे–' फुलांचं तुम्हाला
नाही कळायचं '.
कोणाची गद्य टीका
कोणाची वात्रटिका
कोणाचा कारवा, कोणाचा मारवा,
कोणाचा दसरा, तर कोणाची एक पचकन् रेषा.
संपलं सारं...
सगळीकडे झालं शांत शांत.
पण असं म्हणतात,
खांब मात्र हसत होते
सकाळपर्यंत !

## मारवा

आवरतं घेतलं आहे साऱ्यांनीच.
सूर्याने देखील अवरायला सुरुवात केली,
आपले किरण दिशादिशातून,
मुक्कामाला उतरायची तयारी करीत.
दिसताहेत छायाचित्रं
झगझगीत आकाशाच्या पार्श्वभूमीवर,
थकूनभागून आळसावलेल्या
झाडांच्या मलूल पानांची;
नारळाने चहूबाजूला फिस्कारलेल्या
टोकदार पिसांची;
झाडांवर झेपावणाऱ्या कावळ्यांची;
कलकलाट करीत, चिंचेच्या गर्द राईत

अलगद मिटणाऱ्या बगळ्यांच्या पंखांची !
आता झालीय वेळ
वेडेवाकडे आकार घेऊन
क्षितिजावर सैरावैरा धावणाऱ्या
निशाचरांची.
डोंगरांच्या सावल्या लागल्या धावायला
वाटेत मिळेल त्याचा ग्रास घेत.
त्याच्या कडेकडेने धावते आहे
पाऊलवाट लगबगीने;
वाटेत आडव्या आलेल्या
निर्जल खडकाळ ओढ्याला चुकवून
म्हणत रामरक्षा मनातल्या मनात.
कावळ्यांची कावकाव,
चिमण्यांचा चिवचिवाट,
बगळ्यांची कलकल
थांबते न थांबते तोच
अंधारलेल्या आकाशात
घुमतो आहे आर्त स्वर
टिट्टिर् , टिट्टिर् ......
अशा वेळी झिरपतो आहे
नसानसातून विश्वाच्या
क्षणाक्षणाने, कणाकणाने
कोमल रिषभावरून
धैवतावर ओघळणारा
मारवा !

श्री. विजय आपटे

## विकास

मनात आहे अस्वस्थता जन्मापासून
कळू लागले तो जन्मदिवस
तेव्हा पासून अस्वस्थच आहे
...आजपर्यंत.
ह्या अस्वस्थतेत आहे माझा विकास.
विकास होतो माझा प्रमादांच्या पोटीही
प्रमादांचे क्षण गडप होतात.
होतो विकास, रहाते अस्वस्थता.
ठाऊक आहे फळ प्रमादांचे !
नेहमीच दुर्दैवाचा पाठपुरावा.
चुकवू पहाता नाही चुकत.
प्रमाद > फळ > दुर्दैव > अंत ?
ठाऊक आहे चांगले माझा
अंत आहे अस्वस्थते पोटीच !

## दिव्यांची माळ

रात्रीच्या अंधारात
गाडीच्या वळणावर
सरकत जाते
दिव्यांची माळ
अंधाराच्या सागरात
दिव्यांची माळ
दिसते जणु
पणत्यांची ओळ

आणि माझ्या मनात
पणत्या करीत जातात
विविध रंगी
स्वप्नांचे खेळ.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
20.6.96
2269
काव्य
(स्थळ प्रत)

## शून्य

मी जगतोय
–कारण मेलो नाही !
मरणा मरणाच्या आडवळणातून
सुटत गेलो आजतागायत.
मेलो नाही बाळंतपणाच्या थांब्यावर.
त्या आधी ॲबॉर्शन नाही झाले.
आघातच झाला नाही आईच्या पोटावर.
( नशीब ! )
जन्मलो. जन्म मरणाच्या घाटात
आलो.
आनंद झाला बारशाचा लोकांना.
मला कळलेच नाही.
आठवतच नाही चार वर्षांच्या
अगोदरचे.
कारण ? माहीत नाही.
नंतर मात्र जगलो, वाढलो.
( मेलो नाही ) झिजलो.
वाढदिवस ! आनंद !! पेढे !!!

त्यात रमणे शक्यच नव्हते मन
अपरिहार्यपणे एक एक मरणाचे
स्टेशन पार करीत गेलो.
अपघात टळले. खून अशक्यच.
तात्पर्य : मरण O
आजारी पडलो. औषधांचा खुराक.
पुन्हा मरण O
आज जगतोच
( ते काय सांगायला हवे ? )
मरण ( तूर्त ) O

श्री. गो. ना. कारखानीस

## माझी आवड

कुणा आवडतो रंग गुलाबाचा
कुणा आवडतो वास मधुफुलांचा
कुणा आवडतो शब्द कोकिळेचा
कुणा आवडतो सूर सतारीचा
दाट झाडीने रान शोभताहे
मधुर पुष्पांचा सडा पडत आहे
नदी मंजुळसे गीत गात आहे
असे सुंदरसे दृश्य जिथे आहे
तिथे जावोनी आयु घालवावे
सखी सारंगी, तिला जवळ घ्यावे
सूर काढावा, गीत मधुर गावे
सृष्टिदेवीशी एकरूप व्हावे

## माझी बाळ

रूप सुंदरसे, त्यात गौर कांती
केश कुरळे रुळतात शिर प्रांती
गुलाबाची ठेवून फुले गाली
देवराये धाडिली बाळ खाली–

किती अवयव रेखीव बालिकेचे
हास्य गाली सारखे तिच्या नाचे
हरिणबाले सम नयन चमकतात
चित्त सगळ्यांचे पूर्ण वेधतात–

मित्र स्वारीचे नित्य गृही येत
करी अपुल्या उचलून तिला घेत

गोड पापा सारखा मागतात
तिये देता, सारखे हासतात-

कधी जाता भेटण्या मी सखीला
तिच्या सदनी नेतसे बाहुलीला
तिला बघता उचलोनि सखी घेई
गोड पापा आनंद तिला देई-

हास्य-सिंधूची अशी रम्य बाला
नित्य शोभा आणते या गृहाला
प्रेम कमळाचा स्वाद घ्यावयाला
भ्रमर मित्रांचा येथ जमे मेळा-

अशा असती सदनात बहू बाला
मोद सगळ्या देतात त्या गृहाला
नित्य त्यांच्या घेताच काळजीला
स्वर्ग-वैभव देतात त्या गृहाला-

## जीर्ण पाने

ती जीर्ण जाहली पाने खाली पडती
अन् वारा सुटता भूमीवरती येती
कुणि पायाखाली तुडवुनि त्यांना जाती
कुणि आग लावुनी रक्षा त्यांची करती
ती तारुण्याने मुसमुसलेली होती
अन् हिरवी होती जेव्हां त्यांची कान्ती
ती वाऱ्यासंगे मजेत होती डुलत
अन् डुलतां डुलतां गोड गोडशी हंसत
जरि प्रखर उन्हाचा त्रास तयांना झाला
जरि पर्जन्याचा असह्य मारा बसला

कधि थंडीचाही कडका रानी पडला
परि कधी न गेली शांति मुळी विलयाला
किति प्रेमविरांच्या कथा ऐकिल्या त्यांनी
किति प्रेमभंगही बघती अपुल्या नयनी
किति लोक येउनी त्यांच्या खाली बसती
परि मुळी न ढळली थोडीशीही शांती
किती मजेत त्यांचे तारुण्यही ते गेले
वार्धक्य तयांच्या अंगावरती खेळे
ती वाळुनि, सुकुनी गळुनी खाली पडती
अन् दूर जगातुनि शांत मनाने जाती

श्री. रघुनाथ तावरे

## दिसतात मला आज

दिसतात मला आज
जिथे तिथे ते जखमी श्वास.
धजत नाही मन माझे
ऐकायला तिथली कल्लोळ रडगाणी.
खोपटा खोपटातील संसार
भरडले जातात जात्याखाली
या बहुरंगी, बहुढंगी शहरात.
लिहिली जावीत इथेच खरोखर
महाकाव्ये त्यांच्या जीवनावर
जिथे उसळ पावाची
दैनंदिन होत असते
मात भुकेवर.
चोरली जातात फळे, फुले इथे
स्वप्नातल्या स्वप्नात.
सांगा ना तुम्हीच मग,
इथे लाख लाख कमळे
कशी हो फुलणार ?
परीट घडीच्या पाखरांनो !
घेऊ नका आता
सहानुभूतीचा बुरखा
मागू नका डोळे आमचे
तुमचे जग पाहाण्यासाठी.

सशासारखी बुजरी मने आमची
उगीचच विरघळतात.
हे जीवघेणे खेळ बघताना
पुन्हा पुन्हा आमचे
डोळे भरून येतात.

★

## असा अंधारच आणू

चांदण्याचा सहवास
ऊन, पाऊस, वारा
आणि आईचे प्रेमच फक्त—
मिळते रांगेशिवाय...
येणे करून, रांगाच सर्वत्र
रांगा, रांगांच्या फुटलेल्या रांगा...
रॉकेलच्या गाडीची वाट पाहाण्यात
उजाडलेली अशीच एक रांग
गाडी येणार नाही कळल्यावर
विखुरते सावकाश
जड पावलांनी सांजवल्यावर
घेऊन डब्यात फक्त शिगोशीग अंधार...
आता
पोटास अंधारबाधा झालले
घरोघरचे स्टोव्ह
ह्या अंधाराच्या नवीन आक्रमणाने
पेटूनच उठतील...
तेव्हा आम्ही म्हणू—
" बरेच झाले;
आजच्या रात्रीच्या जेवणाची तर
चिंता सुटली !

उद्या परत जाऊ, रांग लावू.
रॉकेल मिळाले नाही तरी
असा अंधारच आणू
( नाही तरी आता
संपायलाच आला आहे पगार ! ) ”

★

## डोळ्यात आधीच घेऊन अपयश

ओळखीचे चेहरे
न्याहाळीत गेलो तेव्हा
माझाच चेहरा हरवून बसलो.
माझ्या दु:खाला कंठ फुटलाच नाही.
जगण्याची वाटचाल मी
हुडकीत बसलोच नाही.
स्वप्नफुलांना जोजविता आले नाही;
पण आपुलकीला
तिजोरीत झाकलीही नाही.
दिले घेतले होकार
जपत गेलो काळजीपूर्वक.
शब्दहि वापरले जपून
कळू लागले तेव्हापासून...
नंतर शोधीत गेलो किनारे
अंतरीच्या जिव्हाळयाचे
अन् फुलातल्या फुलातील
लवलवीत कोंभाचे.
डोळयात आधीच घेऊन अपयश
अपरिहार्य–
मृगजळासाठी तहानलेले

★

श्री. प्रभाकर अत्रे

## आणि कवींचा चंद्र

पृथ्वीचा परीघ ओलांडून
गेला मानव
अवघ्या अवकाशात
विहरला मुक्तपणे
खिजवीत नक्षत्र तारकांना !
अवकाश ' अनंत ' उरलेच नाही !
अवकाशाच्याच पाऊलवाटेवरून
पृथ्वीचा चेंडू—
' अनंत अवकाशाची कविता ' करणारांवर
भिरकावून देत—
नव्या हनुमंताने
घेतली झेप चंद्राकडे
मनात गुणगुणत एक गाणे
' तोच चंद्रमा नभात '.
पण त्याला दिसलेला चंद्र
' तो ' नव्हता
त्याला नव्हते खळे—
त्यावर नव्हता रथ—
नव्हते घोडे धवल रंगाचे
नव्हती शीतलता
नव्हते हास्य
नव्हत्या पाऊलखुणा
चंद्राचा वेध घेत
रमणीला घेऊन
मधुचंद्रासाठी धावलेल्या
कुणा मानवाच्या !

होते दगडधोंडे
आणि मोठे खड्डे (ही)
चंद्रावरची अवघी कविता
गाडली हनुमंताने त्या खड्ड्यात
त्यावर रचले खूप दगड
लिहिला शिलालेख
' कवींचा चंद्र ' इथे सुखाने पहुडला आहे.

★

## इथे जगण्याची आसक्ती नाही

इथे जगण्याची आसक्ती नाही
मरण्याची सक्ती नाही
पण–
मरणावरती भक्ती मात्र आहे
इथे मरणाच्या भक्तीतून
चिरंजीविता बहरून येते.
इथे–
मरणाच्या मातीतूनच मुळी
स्रवतो जीवितविचार–
हे जीवन कसले ?
कुणाचे ?
कशाचे ?
कशासाठी ?
कुठून ? कुठे ?
ही तर मातीनेच, मातीसाठीच
उभी केलेली–
मातीचीच मडकी !
मातीशीच टकरा घेत घेत

पुन्हा पुन्हा
छिन्नविछिन्न होत होत–
मातीतच मिसळून जाणारी
आणि तरीही–
मातीच्याच ह्या संसारात
ह्या मातीचेच 'सुवर्ण' करू पाहणारी
करू शकणारी
फुटून हसणारी
हसून फुटणारी
मातीतच सरणारी
आणि तरीही–
मातीला सुवर्णस्पर्श देऊन
चिरंजीव करणारी आणि चिरंजीव होणारीही !
ही–हीच मडकी !!

*

## रंगविले ग स्वप्न निळे

त्या स्वप्नांना पंख निळे ग
वरी निळे आकाश
आकाशाच्या निळाईत अन्
प्रीत घेत आकार

प्रीतीचा त्या रंग निळा ग
निळाईत त्या सौगंध
त्या गंधाच्या धुंदीमधुनी
मानस नाचे स्वच्छंद

स्वच्छंदाचा छंद निळा ग
गीताचा त्या अर्थ निळा

निळाईत त्या बुडुनी रमतो
जीवहि अवघा निळा निळा

स्वप्न निळे अन् व्योम निळे ग
निळाईतली प्रीत निळी
स्पर्शामधली वीज निळी अन्
चैतन्याची जाग निळी

आकाशाची भव्य निळाई
पिऊन अपुल्या प्रीतीने
रंगविले ग स्वप्न निळे हे
व्योमाच्या त्या साक्षीने

*

श्री. के. एन्. मुदलियार

# तीन कविता *

– १ –

विश्वाच्या उत्सवाचे
मिळाले मला
निमंत्रण
आणि–
झाले पुनीत
माझे जीवन
फिटले डोळ्यांचे पारणे
झाले तृप्त माझे कान

होता उत्सवात
माझाही एक भाग
वादनाचा
केला तो मी सादर
यथाशक्ती

विचारू का एक ?
आता तरी–
आली का ती वेळ
आत मी येण्याची
तुझ्या दर्शनाची
माझ्या मूक
निःशब्द अभिवादनाची ?

★

– २ –

घे तोडून हे लहानसे फूल
नको लावूस वेळ
भय वाटे मला–
न जाणो–
कोमेजेल ते
आणि पडेल धुळीत

तुझ्या पुष्पहारी कदाचित्
नाही मिळणार स्थान त्याला
निदान
खुडताना दुखवून तरी
तुझ्या स्पर्शाने
त्याला सन्मानित कर...
भय वाटे मला नकळत
मावळून जाईल दिवस
आणि वेळ अर्घ्यदानाची
जाईल टळून

रंग त्याचा जरी नसे गहिरा
आणि गंध आहे–नाही असा
तरी वेळीच ते तोडून
घे ना रुजू करून त्याची सेवा
घे ना...

*

– २ –

घे तोडून हे लहानसे फूल
नको लावूस वेळ
भय वाटे मला–
न जाणो–
कोमेजेल ते
आणि पडेल धुळीत

तुझ्या पुष्पहारी कदाचित्
नाही मिळणार स्थान त्याला
निदान
खुडताना दुखवून तरी
तुझ्या स्पर्शाने
त्याला सन्मानित कर...
भय वाटे मला नकळत
मावळून जाईल दिवस
आणि वेळ अर्घ्यदानाची
जाईल टळून

रंग त्याचा जरी नसे गहिरा
आणि गंध आहे–नाही असा
तरी वेळीच ते तोडून
घे ना रुजू करून त्याची सेवा
घे ना...

*

आलो तुझ्याकडे
तुझ्यासाठी गावयास गीत
अन्
मिळाली मला जागा
तुझ्या दालनाच्या
एका कोपऱ्यात...
तुझ्या जगात माझ्यासाठी
काम नाही काहीच;
माझे निरर्थक जीवन
फुटू शकेल फक्त
हेतुशून्य सुरात...
म्हणून म्हणतो स्वामी,
ज्यावेळी मध्यरात्रीच्या
काळोख्या मंदिरात
तुझ्या मूक पूजेची घंटा घणघणेल
त्यावेळी मला–
तू तुझ्यापुढे गाण्याची
आज्ञा कर...
प्रभातसमयीच्या वातावरणी
जेव्हा सतारीच्या
सोनेरी तारा लावल्या जातील
त्यावेळी तू मला
माझी हजेरी लावण्याची
आज्ञा कर... माझा गौरव कर...

---

* गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांच्या गीतांजलीतील तीन गीतांचा स्वैर अनुवाद.

श्री. तु. वि. सूर्यवंशी

## दैवगाठ

कुणाच्या वाळल्या पाचोळ्यावर
पाय मी ठेवला नाही
कधीसुद्धा
रुप्यांचं झुंबर बघून दुसऱ्यांचं
माझे डोळे कधी दिपले नाहीत
कधीसुद्धा
सत्तेचा गुलाम झालो तरी
राजा कधी समजलो नाही स्वतःला
कधीसुद्धा
कुठल्या मोहाला बळी पडलो नाही
काय लावता बट्टा मला ?
सांगायला गेलो विचारलं नाही ?
द्वैताच्या आरशातून माणूस का बघता ?
माणसातला देव दगडात का शोधता ?
तोंडातून शब्दसुद्धा फेकले नाहीत
पायावर लोळण घेऊन विनवलं
माझा गुन्हा नाही
मी बदनाम होणार नाही
पण दया ?
पाषाण पाझरेल
हे तर तप्त लोखंड
इवलाले माझे बोल (थोडंसं पाणी)
जळून अगदी खाक झाले
आसुडाचे वारावर वार पडत राहिले

कोणीच लक्ष देत नव्हतं
ढुंकून कुणी पाहिलं नाही
माझा मीच हंबरत राहिलो. गाईचं माझं हंबरणं
कुणालाही कसं कळत नाही ?
अन् दैवाची गाठ काही सुटत नाही.

*

## मन हे रानपाखरू

मन हे रानपाखरू
विहरते दाही दिशा
उगी उरास धरून
कसलीशी वेडी आशा

मन हे रानपाखरू
देहाच्या ढोलीत बसे
किलकिल्त्या डोळ्यांनी
जगाला न्याहाळत असे

मन हे रानपाखरू
खातसे मोत्यांचा चारा
मोहक मोहविणारा
खाल्ल्याने गुंगविणारा

मन हे रानपाखरू
फुललेल्या या शिवारी
पिसाट घिरट्या घाली
झेपावून खाली वरी

मन हे रानपाखरू
गेले आहे वेडावून
शिवाला त्या भेटण्यास
आले उरात भरून

मन हे रानपाखरू
मिळता प्रीत-निवारा
क्षणभर घे आसरा
थांबेना त्याचा भोवरा

मन हे रानपाखरू-

*

## एका तटावर

तिथे राहिले खिळून
स्मृतीचा घोट गिळून
एकटक आलोचन
नयन एका तटावर

श्रावणाच्या लहरींची
बूज मनात धुंदीची
बसली होती केव्हाची
त्याच एका तटावर

गेल्या सरीवर सरी
उल्हासाच्या कितीतरी
वाजल्या मनबासरी
त्याच एका तटावर

अन् ग्रीष्म महावैरी
जाळून तो जाई दुरी
गेले देह चितेवरी
त्याच एका तटावर

विसरता न विसरे
धगधगते अंगारे
सर्वनाश राख उरे
त्याच एका तटावर

खिद‌ळलेले जीव ना
होय मिळाले मुक्तींना
ऊर भरे सांगताना
त्याच एका तटावर

*

कु नीलिमा चं. मोडक

## जीवन संगीत

रुणुझुणु रुणुझुणु
सळसळत किणकिणणार
हिरवंकंच जीवनसंगीत
खुळावतंय वाऱ्याला;
ह्या इथेच, अलीकडे
ढवळ्यापवळ्यांना पुकारत
काळ्या काळ्या धरणीला;
कोण शेतकरी नांगरतोय
जीवनाची हाक ऐकत
अन् दूर तिथे पलीकडे
चिऊकाऊच्या घरकुलातून
हिरव्या हिरव्या रानातून
निळसर धूसर धूर जातोय
निळ्या काळ्या आभाळात
अन् तिथे . ......
ठुसक्या चिंचेखाली
तो अन् ती
हाताव हात गुंफून
स्वप्नगुंजन करीत आहेत
सानुल्याशा विश्वात रंगून.
भीषण उल्कापात होतील;
सूर्य-चंद्र-तारे ढळतील.
गुंफण हातांची खळणार नाही.
महायुद्धे येतील, जातील
त्यांच्या गप्पा सरणार नाहीत.

★

## आज नाही हसवत

मनाचं वाकण पिकून पिवळ्या उन्हात
कधीच वितळलं
संधिप्रकाश नेतो आहे दूर मला खोल खोल
शब्दांच्या मौनी डोहांच्या तळाशी
आज हसवत नाही.
आज नाही हसवत मला
पण गाभुळलेलं एक समाधान·
अजून वांझोटा ओरखडा उठला नाहीय
मनाच्या सॅटीन हस्तिदंतावर
कोरड्या हास्यगारठ्यात हृदय थिजलं नाहीय
आसवांचं भिजाळपण; ओलं रक्त हृदयातलं
अजून गर्भ जिवंत; आज नाही हसवत मला
पण हळवं एक समाधान अजून गर्भात जागं आहे
आसूओलं रक्त तेथे अजून भळभळत आहे—

★

## तिची प्रतीक्षा

सोनपंखी पाखराचा पंखचुरा
माखून उदवलेल्या कचपाशात
ओठात साकळलंय् गंधजळ अन्
रुतलेत भोळे सूर कुणा किन्नरीचे
स्पंदणाऱ्या ओल्या उरात
जांभळलेला हळवा संधिप्रकाश
कमळ उसवून बसली आहे
डोळ्यांच्या स्फटिकमण्यांत
आभाळमिठीचा वेध घेत—

★

श्री. मनोहर वाटेव

## पापणी ! पापणी !!

पापणी ! पापणी !
कशाला जपसी
डोळ्यांस इतुकी
जीवाच्या पल्याड...
हवे ते सोडून
नको ते पाहतो
दिसतो भोळासा
खट्याळ उनाड...
पिसाट वादळ
सुटता जरासे
कशाला मिटून
घालसी आवर...
प्रकाश फाकता
दिपल्या डोळयांना
कशाला घालसी
मायेचे पांघरू...
आहेस माऊली
आहेस साऊली
प्रेमळ निर्मळ
लोभस हळवी...
परिही वाटते
तुझाच दोष हा
कशाला गाऊ मी
उगाच थोरवी...
उघडे उत्तान
दिसता काहीसे

उघड्या डोळयांना
नाहीस झाकत...
राहती सदैव
तसेच उघडे
अतृप्त भुकेने
काहीसे पाहत...
म्हणावे कसे मी
तुला ग माऊली
असते अशी का
मायेची करणी...
मनात उठतो
शंकेचा सागर
नव्हेस पापणी
आहेस पापिणी...

★

## इच्छाझेप

उरातील भावनांना
यावा क्वचित पूर
व्हावे सारेच निःशब्द
नको मनाला आवर

जे जे अव्यक्त, असाध्य
त्याचा असू दे हव्यास
माझ्या कवेत येऊ दे
सारे क्षितिज आकाश

झेप असू द्या मनाची
वामनाच्या पावलांची

सारे विश्व व्यापण्याला
नको उसंत क्षणाची

दिव्य दृष्टी मला हवी
गगनाला भेदणारी
चंद्रसूर्य यांचे तेज
क्षणामध्ये गिळणारी

*

## वनवासी गोकुळ

चालले यदुवर मथुरेसी
जाहले गोकुळ वनवासी
श्रीकृष्णाला उरी कवळुनी
म्हणे यशोदा भिजल्या नयनी
" गंध चालला फुला सोडुनी
कळेना काही मज मानसी "
काम धाम तर कुणा सुचेना
अश्रू नयनी, उरी वेदना
नेत्र-पापणी जरा मिटेना
मुकेपण आले सर्वांसी
नयन धेनुचे विरहे झुरती
मूक वासरे स्तना न शिवती
कुणी हरीचा मार्ग हुंगिती
अंत ना त्यांच्या दु:खासी
सुकली पाने, सुकल्या वेली
फुले कोवळी तशीच सुकली
नगरी सारी सुन्न जाहली
नोळखे गोकुळ कोणासी

*

## ही पंचतत्त्व काया

ही पंचतत्त्व काया देऊळ एक माझे
आत्मा तयात मूर्ति हृदयासनी विराजे
पाषाण मंदिराचे हे हाड, मांस, पिंड
अन् खांब मध्य झाला मागील मेरुदंड
नउ मास नउ दिनाला देऊळ पूर्ण साजे
चालावया व्यवस्था अध्यक्ष मेंदू झाला
पंतप्रधान बुद्धी नी कर्म साह्यतेला
मंदीर कार्य चाले हे सांगती जसे जे
हे प्रज्वलीत डोळे या देह मंदिरात
अविराम तेवतात दीप प्रकाश देत
मंदीर चौघडा तो वक्षांत नित्य वाजे
या मंदिरात भक्ती ही जाहली पुजारी
अन् हात दोन झाले फुलमाळि फूलवारी
हे अन्न पुष्पमाला याने स्वरुप साजे
सत्संगती सुनाम सद्भावना नि शुचिता
सोपान मंदिराचे जाण्यास चित्त भक्ता
जिव शीव एक बघता नच तूं, न मी, न माझे

★

## जागा दत्त दिगंबर

जागा दत्त दिगंबर गुरुवर ॥
सरली रजनी सजली धरणी उदया आला दिनकर ।
करिती किलबिल विहंग कोमल गाती गाणी सुस्वर ।
पुष्पे फुलती, वाऱ्यावरती डुलती सारे तरुवर ।
अनुष्ठान जप करण्याला तप निघती सुरनर किन्नर ।
बालदत्त हृदयात वाहु दे भक्तीचा तो निर्झर ।

★

## मी कोण ?

पृथ्वीमोल हिऱ्यापरी मौल्यवान मी जगात
दुर्दैवाने आहे परी दडलेलो मृत्तिकेत
बागेतील पुष्पापरी आहे मीही सुगंधित
दरवळे ना कारण आहे लोपलो कळीत
गगनीच्या सूर्यापरी तेजवान सुप्रकाश
आहे परी आड तेथे काळ्या जलदांची रास
शूरांच्या त्या खड्गासम आहे मीही धारदार
बंद म्यानात म्हणोनी घे ना न्यायाचा कैवार
मी कोण हे कळेल माझे होता पूर्ण कार्य
तूर्त मागे संतांपाशी थोडे आयु थोडे धैर्य

*

श्री. प्रकाश सहस्रबुद्धे ( निराश )

## कुणी न वाटेवरी

काय पाहसी इकडे तिकडे कुणी न वाटेवरी
तुझ्या वेदना तुलाच त्यांचा कुणी न वाटेकरी
चहुबाजूंनी वादळ उठता घाबरलो मी मनी
आसऱ्यास ना छत्र कुठेही धीर न दिधला कुणी
जीवनसागर वाहत आहे संकट–लहरींवरी...
मनी तुझ्या तो का डोकावे पुनवेचा चंद्रमा
करू नको तू तशी कल्पना जोवरि दाटे अमा
जन्म तुझा ना हसण्यासाठी वेदनाच अंतरी...
व्यापुन आकाशाला बसले चिंतेचे मेघ
उफाळुनी वर येतच आहे ज्वाला–उद्‌वेग
उगीच राहू नको संभ्रमी भ्रमिष्ट वेड्यापरी
तुझ्या वेदना तुलाच त्यांचा कुणी न वाटेकरी

★

## उगीच

शोधित फिरसी उगीच वणवण कशास वेड्यापरी
ज्यास्तव झुरसी तेच समिप तव असे तुझ्या रे घरी
दिवस–रात्र तुज झोप नसे रे
इकडुन तिकडे फिरसी का रे
आनंदाचा अमृतघट तो लाव जरा अधरी...
पत्नी लाभे सत्त्वशील तुज
कर थोडेसे तिथेच हितगुज
नंदनवन तुज समीप आहे भोग तेच क्षणभरी...
रांगत येई पुढे सानुले
उचलुन कधि तू त्यास घेतले
वात्सल्याने कधी हात तू फिरविलास का शिरी...

समाधान शान्तीचा सागर
अन् स्नेहाचे इथेच आगर
पूजा भक्ती तिथेच सारे तुझ्या हृदय- मंदिरी
ज्यास्तव झुरसी तेच समीप तव असे तुझ्या रे घरी...

★

## अट

चाला! सतत चालत राहा! आम्ही चालत राहिलो
खूप खूप चाललो, धावायचं नाही अशी अट होती
आम्ही ती मान्य केली होती. कधी धावलो नाही.
कुठं थांबायचं नाही; सावलीचाही आधार घ्यायचा नाही,
ही अट पण लादली त्यांनी आमच्यावर.
आम्हाला नाईलाजाने ती मान्य करावी लागली.
कधी सावलीला गेलो नाही.
पुष्कळ चालून गेलो; पुढे रस्ता संपला;
वाट लागली; वाट संपली. आयुष्य चालण्यातच गेलं.
आम्ही त्यांना विचारलं, "पण आम्ही कशासाठी चालायचं?"
उत्तर मिळालं नाही, मागे वळून पाहिलंही नाही!
आम्हाला कळलं नाही, आम्ही का चालत आहोत.
फक्त त्यांनी सांगितलं आणि आम्ही ऐकलं.
का ऐकलं? का चाललो? का संपलो?
हे मात्र अजूनही कळलं नाही; कळणार नाही.
कारण...'त्या विषयी विचार करू नका, विचारूही नका,'
हे त्यांनी अटीमध्ये नमूद केलं होतं.
आम्ही विचारही केला नाही.

★

श्री. कमलाकर राऊत

## प्रतिष्ठा

आपल्या प्रतिष्ठेला  
बाधा नको म्हणून  
त्याने तिला दूर लोटली.  
तोच शेजाऱ्याने तिला लाटली  
पण ती होती दारूची बाटली !

★

## जमाखर्च

चित्रगुप्ताने विचारले तर  
बिनधोक सांग  
रेशनसाठी लावीत होतो  
आयुष्यभर रांग

★

ग्रंथसंग्रहालय ठाणे
काव्य

श्री. अशोक महाशब्दे

## ओहोटी

त्याला ती जाणीवच नव्हती
कारण...
ती वेळ त्याने पाहिली नव्हती
एक काळ असा होता ..
त्याच्या जीवनाला बहार होती
प्रत्येक रात्र शरदाची
नि गुलाबी मदिरेची होती ..
जीवनाच्या वृक्षाला
नि त्यावर विसावलेल्या वेलीवर
बहराची बरसात होती
पण—
हे सर्व वसंतातच ओसरलं
सागराच्या ओहोटीप्रमाणे...
म्हणूनच आज तो
सागराच्या ओहोटीकडे बघून
आपल्या जीवनाची ओहोटी
थांबविण्याचा क्षुद्र प्रयत्न करीत होता

*

## सावली

क्षितीजावर उडणारी पाखरं
उडत आहेत—
बांधलेल्या स्वप्नांचे मनोरे
झुलत आहेत
पण... पण...

ती स्वप्नं आज मृगजळ
बनून चकवत आहेत...
फुललेली भावना आज
जळू लागली आहे...
नि चढलेली नशा आज
उतरू लागली आहे...
जीवनाच्या ह्या करुण प्रसंगात
दुःखाच्या ह्या बेबंद सागरात
गीत माझं हरवलं आहे...
साथीला आता माझ्या
फक्त सावलीच उरली आहे

*

## एक क्षण

एक क्षण असा येतो
अश्रूंचे मोती बनवून निघून जातो
एक क्षण असा येतो
अश्रूंचं खारं पाणी प्यायला लावतो
एक क्षण असा येतो
फुले गुलाबाची उधळून जातो
एक क्षण असाही येतो
काटे गुलाबाचे खुपत ठेवतो

*

श्री. रा. शं. अत्रे ( राश्मात्र )

## पायगुण

माझ्या घरची घागर
कधी नाही ग भरली
तुझ्या शिरीची चुंबळ
पळभरे विसावली

माझ्या घराच्या चुलीचा
सदा भुकेला पावक
अन्नपूर्णेसम हात
शमवीत सारी भूक

माझ्या दारच्या दिव्याची
सदा चाले फुरफूर
तुझ्या स्नेहाळ नेत्रांनी
दीपविले चराचर

माझ्या दाराला न लागे
कधी तोरण फुलांचे
परी सहवास तुझा
जणू भूषण मोलाचे

माझ्या शब्दांचा न चाले
कधी खेळ कागदांशी
आज कोषात साठल्या
कवितांच्या लाख राशी

*

## कमलपत्रि या संसाराला

उराउरातिल व्यथा कळावी
घराघरातिल दुःख सरावे
इतुकी इच्छा मनी असावी
जीवनचंदन सतत धुपावे
        कधि न कळावे चुकुन मनाला
        सुख दुसऱ्याचे हरण करावे
        परदुःखाची झुळुक लागता
        हृदयतडागी वलय उठावे
सदा असावे मग्न पूजनी
माणुसकीच्या गंगेकाठी
नितवचनाचे अर्घ्यदान ते
पुण्य फुलावे काठोकाठी
        सदा अंगणी सदाफुलीसम
        सुख-शांतीचे बाग फुलावे
        कमलपत्रि या संसाराला
        निःस्पृहतेचे जल माखावे

★

## पुनर्भेट

अजुन असावा वाहत तेथे
ओंबिल ओढा निळया जलाचा
अजुन फिरावा पिसाट वारा
सवे घेउनी गंध फुलांचा
        खळखळणाऱ्या जलास बघुनी
        उगिच डुलावे वटवृक्षाने
        पुष्प नसावे उदरी तरि पण
        पिंपळ हलवी नाजुक पाने

सकाळ होता इथून जातिल
शिरि कुंभासह तुझ्या मैत्रिणी
इथेच ठेउन घट डोईचे
हितगुज करतिल कानोकानी
अजुन तेथिल विटके देउळ
तशीच त्यातिल मुक्ताबाई
घडक्या वेशीवरती बहरे
माहेरवाशिण श्रावण-जाई
संध्याकाळी उगिच बसावे
पारावरती घुमवित पावा
सांजवातिचे कारण शोधुन
झाडावरचा कापुस न्यावा
कधि तू यावे सोनसकाळी
प्राजक्ताचा सडा पडावा
करि काटा तो कोरांटीचा
कंपितहस्ते मी काढावा
लाल मेंदिच्या रक्तिम हस्ती
स्वैर फिरावे या बोटांनी
आज स्मृतीसह पुन्हा लाभली
किति यत्ने अन् कितिक युगांनी

*

श्री. शशिकांत पाळंदे

## संगम

गंगा, गोदा अन् कावेरी
संगमात कल्पकता न्यारी
निर्मिण्यास अस्मिता सागरी
अक्षय अमृत लहरीमधुनी
एकात्मकता वाहो भरुनी
हिम-फत्तर-चंदन-जल-नर्तन
मृदु कणखरता नसानसातुन
द्वेषाग्नीला अग्नी देउन
स्नेहाचे संगीत बरसुनी
एकात्मकता वाहो भरुनी
इंद्रधनूची रंगसंगती
छटा कशा मिसळून नांदती
शुभ्रतेमधे लोप पावती
विविधतेत एकत्व प्रकटुनी
एकात्मकता वाहो भरुनी
मोरपिसांचा तलम गालिचा
मिलाफ नैसर्गिक रंगांचा
मोहक नमुना समरसतेचा
समाजजीवन तसे रंगुनी
एकात्मकता वाहो भरुनी
संगम होइल तेव्हा होवो
भावनैकता लगेच येवो
मानस एक सरोवर होवो
एकरूपता सदैव टिकुनी
एकात्मकता राहो भरुनी

*

## वटपौर्णिमा

वटपौर्णिमा–
दरवर्षी येते नि जाते.
आमची ही पूजा करते
मनोमनी प्रार्थना करते,
" जन्मोजन्मी लाभू दे
हाच पती, अस्साच " म्हणते

पण एरव्ही मात्र तणतणत असते,
" मलाच नेहमी मर मर मरावे लागते,
तुम्ही काहीच करीत नाही
घरीही नाही, बाहेरही नाही..."

मी मात्र शांत असतो
कारण–
मी (आणि तमाम पुरुष)
बाहेर किती खस्ता खातो
ह्याची तिला कल्पना नाही.
दिली तरी समजत नाही.

मलाही उमगेना उपाय ह्याला
दुरंगी ढालीचा किस्सा आठवला
झट्कन डोक्यात प्रकाश पडला

पुढील जन्मी अदलाबदल करायचा
म्हणजे चक्क सेक्स बदल करायचा.
निर्णय घेऊन तिलाही सांगितला.
आश्चर्य म्हणजे तिलाही तो पटला.
' तिनं व्हायचं पुरुष; मी व्हायचं स्त्री '
नवरा–बायकोच्या नात्यावर मात्र
फिरवायची नाही इस्त्री

झालं...
तो झाली पती
मी झालो पत्नी
ती, म्हणजे तो झाला शांत
मी लागले कुरकुरायला
सदान् कदा तणतणायला ..

मग आली वटपौर्णिमा
मी पण पूजा केली.
मनोमनी प्रार्थना केली
" नको रे देवा स्त्रीजन्म
तीच बायको दिलीस तरी चालेल
पण पुरुषच राहू दे शतजन्म .."

★

## आई

स्त्री तर पत्नी केवळ क्षणभर, माता जन्मांतरिची जगभर
असो नसो वा नारी सुंदर, मातृत्वाचे रूप मनोहर
दर्या सौंदर्याचा सीमित, ममतेचे आकाश अबाधित
आईच्या आठवणीत जगते, तगते, तरते जित मन्वंतर
विश्वसुंदरी दरेक वर्षी निवडतात ते नर गुलहौशी
विसरतात पण पुढल्या वर्षी मदिराक्षीची मिजास कुठवर ?
सात्त्विकतेची पवित्र सरिता, मूर्तिमंत ती सहनशीलता
लोण्याहुनही हृदय मुलायम, हिरकणिसम पण होते कणखर

सर्वाधिक मउ चीज कोणती ? कूस आईची लुसलुशीत ती
तान्ह्याचे ते बाह्य जगातिल, गर्भाशय उबदार निरंतर
काचोळीची कवच कुंडले, तुटति पाहता बाळ भुकेले
पान्हा फुटता रक्त सळसळे, दूध ओघळे सरसर झरझर
भूक लागता 'आ'च प्रकटतो, वेदनेतुनी 'ई'च उमलतो
अजाणामुखी सर्वांआधी, 'आई' शब्दच घेतो अंकुर
कळकळीतुनी कळते आई, केवळ उत्कट भावनाच ही
हृद्स्पंदन ज्या क्षणी थांबते, आइच स्मरते अंती तिथवर.

★

श्री. वसंत गोखले

## मधुगंध

मधुगंध सुटावा जिकडे तिकडे पार
चांदणे पडावे टिपुर पहाटे न्यार
कानावर यावी भूपाळी होनाची
ओठात स्फुरावी ओवी ज्ञानेशाची
ह्या सुंदर समयी छेडावी कुणि वीणा
कुणि ओवाळावे भक्तीने श्रीकृष्णा
कधि मनांत येते आपण पहाट व्हावे
प्रभुचरणी राहुनि सर्वांना सुखवावे

*

## पंढरीच्या वाटेवरी

पंढरीच्या वाटेवरी पडे पाऊस भक्तीचा
चाले गजर जोरात, ज्ञानदेव तुकोबाचा
पंढरीच्या वाटेवरी दरवळे जाईजुई
साऱ्या आसमंतातून राहे भरून जनाई
पंढरीच्या वाटेवरी दिंड्या पताकांचा थवा
साऱ्या भाविक संतांना नित्य विठ्ठलचि हवा
पंढरीच्या वाटेवरी वाहे वारा मंद मंद
देई आदेश नेमाने, भज मानवा गोविंद
पंढरीच्या वाटेवरी चाले जेव्हा संकीर्तन
येती पंढरी सोडून, ऐकावया जनार्दन

*

## कसे ह्यांचे ग होणार ?

चंद्र, सूर्य का ग आई, खेळतात शिवाशिवी ?
एक सारखे खेळून, दमत ते कसे नाही ?
आकाशीच्या अंगणात, लपतात कुठे दोघे ?
चांदण्यांना खेळायला, सांग का हे घेत नाही ?
खेळ यांचा चालतसे, जरी आई रात्रंदिनी
कसे ह्यांचे आईबाबा रागावत ह्यांना नाही ?
नाही का हे गिरवीत, धडे दिलेले शाळेत ?
कसे ह्यांचे ग होणार ? मला समजत नाही

*

श्री. शिरीष देशपांडे

## सम्राज्ञी

ती एक सौंदर्याची सम्राज्ञी होती
नयनात तिच्या मदिरा होती
गालावरती गुलाबी फुलं होती
अधरावरती चांदण्यांची धुंदी होती
कॉलेजच्या प्रांगणात तशी ती ' फेमस ' होती
ती चालताना वारा थबकायचा
गगनाचा सम्राट ' अरुण ' लाजायचा
तसं तिचं सौंदर्य अप्रतिम होतं
पण तरीही तिच्यात एक कमी होतं
जे दृष्टीला कोणाच्या दिसत नव्हतं
बिचारीला ' हृदय ' च नव्हतं.

*

## आग

तुझ्या नेत्रातले आकाश
मी पिऊन टाकलं
नी अधरामधलं चांदणही तस्संच
प्राशन केलं
तुझ्या स्पर्शातली वीज
शरीरावर झेलली
नी ' हृदयातली ' आग
उरी जपतानासुद्धा कधीच घाबरलो नाही
कारण मला माहीत होतं
की तुझ्या नेत्रांच्या आकाशात

*

अधरातल्या चांदणीचा शोध करताना
विजेचे लोळ स्पर्शून गेले
तरी तुझ्या 'हृदयातल्या स्वप्नील आगीत'
मी कधीच होरपळणार नाही !

*

## आई

आई तुझ्या कुशीमध्ये
ऊन निवाऱ्याची छाया
तुझ्या हाताच्या जादूने
फुलापरी नटे काया
बोल एक कौतुकाचा
आणी हृदया भरती
दोन शब्दांच्या ईर्षेने
चंद्र ओढेन खालती
घास ओठी माझ्या देतां
कारलेही गोड व्हावे
मिठानेही तुझ्या स्पर्शे
साखरेचे रूप ल्यावे
आई तुला बोलाविता
हाक प्राणांतून यावी
तुझ्या अंगी देवपण
साक्ष ईश्वराने द्यावी
विसावता पदराखाली
काळ जाईल माघारी
गीत अंगाईचे गात
जाऊ चांदण्यांचे दारी

*

श्री. विकास कारखानीस

## विद्ध जटायू

जन्मलो तेव्हाच पाहिला होता क्रांतिसूर्य आम्ही सुद्धा
मागितलं होतं जागृतीचं वरदान, आकाशाकडे आम्ही सुद्धा.

प्राणांमध्ये तेव्हा आमच्या दिव्यत्वाची हांक होती
नव्या विचारांच्या पंखामध्ये वैनतेयाची झेप होती.

– पण अनानक ते आले चेतवित उंच उंच ज्वाला
प्रसिद्धीच्या झोतात त्यांच्या सूर्य सुद्धा झाकळून गेला.

आम्हीही क्षणभर भारून गेलो त्यांच्यापुढे स्वतःस भुललो,
मागितलें त्यांनी आमचे पंख–म्हणाले, 'तुमच्याच हितासाठी'
आम्हीही ते देऊन बसलो, एक वेदना उरली पाठी

पंख घेऊन निघून गेले – राहिला मागे फक्त अंधार
एका डोळी अश्रू आमच्या, एका डोळी पेटलाय् अंगार.

सत्काराचे हार मिरवीत होताहेत ते आज शतायू
आमचे पंख त्यांच्यापाशी–आम्ही मात्र विद्ध जटायू !

*

## घालु नको तू शपथ घना.

श्रावणवेडी धून अनोखी छेडु नको तू आज पुन्हा
आठवून ग त्या रात्रीला घालु नको तू शपथ घना...

मोरपिसाचा साज लेवुनी इंद्रधनूचे रंग उधळले
जलधारेच्या तालावरती श्वासांचे मी गीत छेडिले
आता उरल्या वाळूवरती जुन्या स्मृतींच्या दोन खुणा,
आठवून ग त्या रात्रीला घालु नको तू शपथ घना...

पाहियली मी ओढ प्रीतिची सखे तुझ्या ओलेत्या वक्षी
अवचित येता मिठीत माझ्या मोहरले स्पर्शांचे पक्षी
रजनीगंधे, शोधु नको तू त्या रजनीचा गंध जुना,
आठवून ग त्या रात्रीला घालु नको तू शपथ घना...

कसे जाहलो प्रणयामध्ये एक जीव नाही कळले
कधी जागलो तुझ्या कुंतली पहाटेस नाही कळले
आज बैसुनी पैलतिरावर नको स्मरू त्या धुंद क्षणा,
आठवून ग त्या रात्रीला घालु नको तू शपथ घना...

श्रावणवेडी धून अनोखी छेडु नको तू आज पुन्हा
आठवून ग त्या रात्रीला घालु नको तू शपथ घना.

*

## भेट

मध्यान्हीच्या उन्हात
तापलेल्या वाळूवर
नारळीच्या झाडाला टेकून
उभी होतीस तू
माझीच प्रतीक्षा करीत !
मी मात्र दूर उभा राहून
पहात होतो,
तुझ्या जिवाची तगमग
माझ्या भेटीची तळमळ !

कितिदा तरी वाटलं होतं,
धावत येऊन मिठीत घ्यावं
तुला सारं काही विसरून,
स्वाभिमान मला अडवत होता
कालचं भांडण आठवून !

पण......

पण जेव्हा तुझ्या गालावर
चमकले चार अश्रुबिंदू
तुझ्या डोळ्यातून ओघळणारे,
तेव्हा धावलो तुझ्याकडे
स्वाभिमानाचे पाश झुगारून सारे !

आणि तू...

समोर उभा मला पाहून
भर उन्हात तुझ्या गालावर
पौर्णिमेचं चांदण फुललं होतं,
ओठात ओठ मिसळलेस तेव्हा
भान माझं हरपलं होतं !

*

श्री शरद कुळकर्णी

## शाश्वत अशाश्वत

माझ्या सिगारेटच्या
धूम्रवलयातून
बाहेर पडतात स्वप्ने.
धुरकटलेली, अशाश्वत !
एकातून ... दुसरे ...
दुसऱ्यातून ... तिसरे ...
चौथे, पाचवे ... सातवे ...
अन् बसतो शेवटी –
चटका.
ज्याने जाग येते.
ती मात्र असते
शुद्ध शाश्वत ! !

*

## एक पाखरू फडफडले

पानझडी त्या वृक्षाखाली
उभा राहिलो एकच क्षण मी,
असंख्य पाने भुळभुळ गळती
धुळीत मिळती, होत निकामी !
अन् दिसतो हो विद्रुप भारी
फांद्यांचा तो रुंद खराटा,
आकाशाच्या अंगणातला
जणू झटकतो कचरा-कपटा !
वसंतातल्या एके काळी
इथे जाहले कोकिल-कूजन,

इथेच पूर्वी कुणि बैजूने
केले होते ' सखिमनरंजन '
कुणि चिंतेने व्याकुळ होउन
इथे विसरले निज व्याकुळता,
शल्य मनातिल पार झटकुनी
तये मिळविली इथे सफलता
कुणि चुकलेले वाटसरू, या
इथेच आले मार्गावरती,
उद्वेगाने भटकत असता
कुणा जाहली इथे उपरती !
प्रात:कालिन धुक्यापरी ते
गतकाळाचे वैभव सरले,
आणि कुठेतरि खोल अंतरी
एक पाखरू फडफडले !

★

## चंद्र वेडा ( एक रूपक )

एक होता ससा,
अगदी अगदी एवढासा.
भोळा भाबडा, बिचारा,
सारखा टाकी उसासा !
काय असावं त्याचं दु:ख ?
कुणा कधी गवसलं नाही,
मन आपलं मोकळं करून
सशानं कुणा सांगितलं नाही !

खेळायचा नाही, बागडायचा नाही,
चार चौघात बसायचा नाही.

आकाशात डोळे लावून —
सारखं कुठंतरी पाहायचा.
असा होता रोजचा क्रम
भोळ्या-भाबड्या सशाचा!
ससा कुढे आतल्या आत,
अन् म्हणे मनातल्या मनात,
" एक दिवस तरी उगवेल -
अखेर माझ्या आनंदाचा!"

अन् खरंच एकदा झालं काय
सशाचा ठरेना धरणीवर पाय
हरवलेलं गवसावं तसा ससा नाचला,
लिंबोणीच्या झाडामागं म्हणे त्याला चंद्र दिसला.
ज्याला त्याला सांगत सुटला,
" आज मला चंद्र भेटला!"
एकदा तर मोठ्यानं ओरडला ससा,
" चंद्राच्या मुखावर माझाच ठसा!"

" चंद्र माझा, मी चंद्राचा,"
हाच महामंत्र सशाचा!
सशाचं असलं विचित्र विधान
ऐकून चिडलं सारं रान!
दिशा दिशातून आवाज उठले,
" सशा, तुला वेऽऽड लागले!"
भोळाभाबडा ससा बिचारा,
झाला अगदी कावरा बावरा!

घेतलं त्याच्या मनानं,
" नको आता येथे राहाणं!"
एकाएकी धावत सुटला,
कंठ त्याचा कोरडा पडला.

वाटेत आडवी एक नदी...
काठोकाठ भरलेली !
सशाची स्वारी एकाएकी–
काठावरच थबकली !

तहानलेला ससा बिचारा
किंचित् झुकला पाण्यावर,
तोच त्याची दृष्टी खिळली–
चंद्राच्या प्रतिबिंबावर !

क्षणार्धात झेप घेतली
चंद्रवेड्या सशाने
सशालाही स्थान दिलं
आपल्या अंकी चंद्राने !

★

श्री. मुकुंद नारायण गोखले ( एम्. नारायण )

## तर हे असं –

... तर हे असं जीर्ण वस्त्रागत आमचं जीवन !
बसता उठता कुठेही टरकणारं
रोज नव्या भोकातून डोकावतात नव्या समस्या
तडजोडीचे टाके दिसतील हाताहातावर
मारलेल्या हरेक इच्छेचं प्रतीक एक एक रफू
पण आतापर्यंत –
त्यांनीच तर जपली आमची अब्रू !

*

## आमंत्रण

जागोजाग खाकरांची किलसवाणी वसाहत
विष्ठेचे काळवटलेले ढीग कवटाळून
लक्तरे लावलेल्या उभ्या लूतभरू झोपड्या
पोटात साठवितात नागडी उघडी धामट शरीरे
खपाट पोटीही वासनांची भुकेली–
पाहून, न कळत रडतात माझेही डोळे
तिथेच प्रसवणाऱ्या माद्या
जन्मणारे अनामिक आत्मे
देऊन येणारे आमंत्रण एकादशीला !

★

## दोस्त

ना कुणाचा आधार होता ना सहानुभूती, होती तुटलेली नाती
नव्हतं कुणी जवळचं, ओल्या जिव्हाळ्याचं, एक मलाच जाण होती
झोपडीवजा घर होतं, उभं डोक्यावर कर्ज घेऊन
बेकार हातांना काम मिळत नव्हतं वणवण उन्हात फिरून

थकलेली आई होती, नव्हते वडील होता, हृदयावर एक घाव
आकाशवाडीत तारे होते चंद्राचाच अभाव.
अशा बेचव आयुष्यातही बारिक डोळयांतून तो हसायचा
क्षणमात्र, त्याला पाहून शिशिरही फुलतोयसा भासायचा
रोज घरी येत असे म्हणे : ' माणसानं कसं हसावं खेळावं–
हवं तर भरपूर भांडावं; पण लगेच विसरून जावं '
–तर असे हे मित्र मिळायला नशीब घेऊन यावं लागतं
चहा-चिवड्याचे खूप भेटतात; प्रेम विकत घ्यावं लागतं
वारला अचानक. नव्हते नाते, तेव्हा तरीही डोळे पाणावले
दोन अश्रू खाली सांडले; दोन गालावर सुकून गेले
आता एकटेपणात कधी आठवतात शब्द : ' माणसानं हसावं खेळावं
हवं तर भरपूर भांडावं; पण लगेच विसरून जावं. '

★

श्री. दिनकर शिर्के

## या सिमेंटच्या जंगलातून–

बेभान हिंडतोय मी कधीचा
या सिमेंटच्या जंगलातून
हातात अक्षरांची झोळी घेऊन
माझ्या गुदमरलेल्या आत्म्यास सांभाळीत
काळ्याकुट्ट रात्री लख्ख पेटलेले हे आंधळे शहर
इथल्या साऱ्यांचेच आत्मे कसे हरवलेले
वाट शोधायचीही इच्छा नाही त्यांना आणि
इथले सारेच रस्ते चक्रव्यूह झालेले
मी किती जोराने पुकारतो आहे त्यांना,
'या, आपण जंगलातून बाहेर पडू' म्हणून
तरीसुद्धा अस्मिताहीन जिणे घेऊन नाचताहेत
दिसत कसे नाही त्यांना उघडे गटार फुलांनी सजविलेले
नाही बघवत डोळयांना त्यांच्या अन्यायाच्या कॅब्रे.
डोळेसुद्धा फोडून घ्यावेसे वाटतात आपलेच
जेव्हा हिंडतात हडकुळी त्री रानोमाळ
माणसातल्या माणुसकीला चावे घेत.
दिसत नाही त्यांना त्यांच्या पायतळीचे
अमावास्येत बुडालेले गरिबांचे जागणारे जग.
तिथे कधी चंद्र उगवणारच नाही, याची
त्यांनी पूर्ण व्यवस्था कधीच केली होती.
आणि आता त्यांना कळलंय अचानक,
सूर्य तेथे उगवतोय म्हणून
भविष्याच्या भीतीने भयभीत होऊन
चिरडताहेत साऱ्यांना.

मी मात्र हिंडतोय बेभान ही अक्षरे घेऊन
सांगत, 'या सिमेंटच्या जंगलातून
लवकर बाहेर पडा' म्हणून

★

## या इथल्या धरतीने

या इथल्या धरतीने, काळ्याशार मातीने
घेतले आहे शोषून मला, एक एक पाऊल उचलताना
वीजवेगाने खाली येतात पाऊसधारा.. धुंद
घेतात बाळउडी हिच्या अंगावर, तेव्हा
मीच पाहिले तिला फुलासारखे त्यांना झेलताना
श्रावणात हिरवी मखमल पांघरुन
गंधोद्दाम फुलगीते गाताना
शहारून जातात राने राने, अलगुजाचे
सोनेरी स्वर टिपतात कोवळी थरथर
तेव्हा मीच पाहिले आहे तिला . हसताना
खळबळत्या सागराच्या जळलाटा, आपल्या
दुधाळ अंगावर झेलीत उतरतात
पाण्यावर पाणपाखरे मुलायम चरणांनी
तेव्हा मीच पाहिले तिला त्यांना कुरवाळताना.
सूर्यतप्त डोंगरकुशीतून मधूनच
झिरपणारा झऱ्यांचा गारवा
जसा अंधाऱ्या घनरात्री चमकतो
एखादाच काजवा
उन्हात जळताना अंग अंग, मीच पाहिले.
तिला चांदण्या गंधरात्री पुन्हा गाताना
या इथल्या धरतीने, काळ्याशार मातीने
घेतले आहे शोषून मला एक एक पाऊल उचलताना

★

## रस्ता

एखाद्यालाच मिळतो मोकळा रस्ता
बाकीचे वाहनगर्दीत अडलेले,
एखादाच असतो भाग्यवंत
बाकीचे दुःखात सडलेले
हव्या असतात किती तरी गोष्टी
सगळ्याच मिळत नाहीत,
वाटोवाट भेटतात खूप झाडे
सगळयांवरच फुले फुलत नाहीत
मोकळा, गाणे गाणारा रस्ता
आपल्या नशिबातच नसतो,
तरीसुद्धा मनाला समजावीत
आपण सारखे चालतच असतो.

★

REFBK-0020717
REFBK-0020717

मनात कवितेचे इवलेसे रोप लावलेली अनेक अज्ञात माणसे मुंबईच्या एका ईशान्य उपनगरात राहतात. त्याच उपनगरात दुसऱ्याच्या प्रांगणातील रोपांचेही दिलखुलास कौतुक करणारी अनेक दिलदार, निरामय माणसे आहेत. एकदा, परमेश्वराने निश्चित केलेल्या एके दिवशी, इकडची काही व तिकडची काही माणसे एकत्र आली व नंतर दर महिन्याच्या पहिल्या रविवारी भेटू लागली. आपल्या कविता एकमेकांस वाचून दाखवू लागली... मधून मधून काव्यक्षेत्रातील वडिलांना प्रेमे आमंत्रून त्यांच्या कवितांना आपले कान देऊ लागली. असे वर्षानुवर्षे होत राहिले... एके दिवशी—पुनश्च, परमेश्वरानेच निश्चित केलेल्या—आपल्या रोपावर उमललेली अनताची अक्षरफुले घेऊन मऱ्हाठी सारस्वतांच्या भेटीस जावे, असा विचार उद्भवला त्याचेच हे प्रकट रूप...'तारांगण'...